# हाकारा

वर्ष विसावे ○ अंक दुसरा

एप्रिल - जून १९९९



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | प्रा. अ. रा. कुलकर्णी |
| **उपाध्यक्ष** | : | वैद्यरत्न भा. पु. नानल |
| **मुख्य सचिव** | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| **सह सचिव** | : | श्री. पुरूषोत्तम आगाशे |
| **खजिनदार** | : | डॉ. वि. श्री. कुलकर्णी |
| **सभासद** | : | डॉ. न. शं. देवधर |
| | : | डॉ. विजय भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. शं. गो. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |
| | : | श्रीमती आरती कौलगेकर |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## अनुक्रमणिका


- संपादकीय — २
- आदिवासी विकास योजना — ३
- आदिवासी जमातींमध्ये सोयरसंबंध कृतीची गरज : सुनिल कुमरे — १८
- परधानी विवाह आणि गीते : सौ. कुसुम अलाम — २१
- राजा पानठा गाडा ठाकूर : आदिवासींचे परिवर्तनवादी समाज सेवक : वीरसिंग पाडवी — २५
- आसाममधील आदिवासी -परिस्थितीजन्य पृथःकरण : रा. वि. भुस्कुटे — २७
- गोंडी चळवळ-आदिवासी एकसंघतेला अडथळा : सुनिल कुमरे — ३१
- कथा - गाडी जादू : रायसिंग महाराज — ३३
- कविता - लेडिज होस्टल : भुजंग मेश्राम — ३८
- माळशेज : भुजंग मेश्राम — ४०


वर्ष विसावे : अंक - दुसरा
एप्रिल-जून १९९९

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ५८८७२१९

**संपादक :**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
पुरूषोत्तम आगाशे

**मुखपृष्ठ छायाचित्र**
पुरुषोत्तम आगाशे

**मूल्य रु. २०/-**

**प्रकाशक :**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
यांच्यासाठी असाईन सिस्टीम्स्,
६६७, दत्तवाडी, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

**अक्षरजुळणी**
असाईन सिस्टीम्स्
दत्तवाडी, पुणे-३०.

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

'हाकारा'चा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

राज्य सरकारने आदिवासींसाठी विविध विकासाच्या योजना सुरू केल्या आहेत. आदिवासींना त्यांच्यासाठी असलेल्या विविध लाभदायी योजनांची माहिती व्हावी व त्यांचा जास्तीत जास्त लाभ घेता यावा या उद्देशाने शैक्षणिक व आर्थिक विकास योजनांची ओळख करून देण्यात आली आहे.

आदिवासी जमातीतील विवाह जमवताना काही कुळांमध्ये विवाह संबंध टाळले जातात तर आदिवासींमध्ये आंतर जातीय विवाहाचे प्रमाण हळूहळू वाढत चालले आहे. अशा या समस्येविषयी श्री. सुनिल कुमरे यांनी आपल्या ''आदिवासी जमातींमध्ये सोयर संबंध - कृतीची गरज'' या लेखातून चर्चा केली आहे.

विवाह हा एक आनंदपूर्ण सोहळा असतो. नाच गाण्यात रमत स्वच्छंदी जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या विवाहाचा तर थाटच न्यारा. महाराष्ट्रातील परधान या जमातीच्या विवाह सोहळ्याचे वर्णन व त्याप्रसंगी गायिली जाणारी गाणी यांचे चित्रण सौ. कुसुम अलाम यांनी अत्यंत समर्थपणे आपल्या लेखातून केले आहे.

राजा पानठा व गाडा ठाकूर यांना आदिवासींमध्ये अत्यंत मानाचे असे स्थान आहे. या दोन थोर पुरुषांचा परिचय श्री. वीरसिंग पाडवी यांनी आपल्या छोट्याशा लेखातून करून दिला आहे.

आदिवासी अभ्यासक श्री. रा. वि. भुस्कुटे यांनी आसाममधील चहा मळ्यात काम करणाऱ्या स्थलांतरित आदिवासींच्या समस्या आपल्या अनुवादित लेखातून मांडून या आदिवासींना अनुसूचित जमातीचा दर्जा मिळण्याची गरज व्यक्त केली आहे.

आजकाल विविध वर्ग, जाती जमातींच्या चळवळी, साहित्य संम्मेलने यांची जंत्रीच उडालेली दिसते. आदिवासी देखील याला अपवाद नाहीत. असे वेगळे सवतेसुभे निर्माण करण्याची गरज काय? असा प्रश्न श्री. सुनिल कुमरे यांनी आपल्या दुसऱ्या लेखातून विचारला आहे व आदिवासी एकसंघतेची गरज व्यक्त केली आहे.

धुळ्याचे श्री. रायसिंग महाराज यांनी अत्यंत उत्कंठापूर्ण व मनोरंजक अशी 'गाडी जादू' ही कथा लिहिली आहे.

नेहमीप्रमाणेच ख्यातनाम आदिवासी कवी श्री. भुजंग मेश्राम यांच्या खास शैलीतील कविताही आहेतच.

'हाकारा'चा हा अंक सर्वसामान्य वाचक, कार्यकर्ते, अभ्यासक यांना माहितीपूर्ण ठरेल असा विश्वास वाटतो. आपल्या प्रतिक्रिया आम्हाला जरूर कळवाव्यात.

**- कार्यकारी संपादक**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशत: अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# आदिवासी विकास योजना

*फार पूर्वीपासून आदिवासी समाज जंगलाने व्यापलेला, दऱ्या खोऱ्यांच्या प्रदेशातून रहात आला आहे. रस्ता व दळणवळणाच्या अन्य सोयी सुविधांअभावी बाह्य जगाशी संपर्क न आल्याने आदिवासी समाज मागासलेल्या अवस्थेतच रहात होता. मात्र त्याचे व जंगलाचे अतूट नाते होते व तो जंगलाच्या सान्निध्यातच आपले जीवन जगत होता.*

*स्वातंत्र्यानंतर मात्र परिस्थिती बदलत गेली. रस्ते व विविध सोयी-सुविधांमुळे आदिवासींचा बाह्य जगाशी संपर्क आला. बिगर आदिवासींचा आदिवासी भागात शिरकाव झाल्याने आदिवासींचे शोषण वाढले. जंगलेदेखील तुटत गेल्याने आर्थिकदृष्ट्या मागासलेला आदिवासी गरिबीच्या खाईत लोटला गेला.*

*आदिवासींचे मागासलेपण लक्षात घेऊन सरकारने त्यांना अनुसूचित जमातींचा दर्जा दिला आहे व या संवर्गासाठी अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत. आदिवासींचा विकास व्हावा त्यांनी अन्य सामाजिक गटांच्या बरोबरीने आपला शैक्षणिक व सामाजिक स्तर उंचवावा असा उद्देश या आदिवासींसाठी असलेल्या योजनांमागे आहे.*

*आदिवासींसाठी असलेल्या विविध शैक्षणिक, आर्थिक व अन्य विकासाच्या योजनांची माहिती त्यांना व्हावी व अधिकाधिक आदिवासींनी त्याचा लाभ घ्यावा या हेतूने अशा योजनांचा परिचय येथे करून देत आहोत.*

## (अ) शैक्षणिक विकासाच्या योजना

### *(१) शासकीय आश्रमशाळा समूह योजना*

**उद्देश व स्वरूप :**

दुर्गम व डोंगराळ प्रदेशात वास्तव्य असलेल्या आदिवासींच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने १९७२-७३ पासून शासकीय आश्रमशाळा समूह योजना राबविण्यात येत आहे. या शाळात आदिवासी विद्यार्थ्यांच्या इ. १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेष, अंथरुण, पांघरुण व इतर लेखन साहित्य इ. नियमानुसार मोफत पुरविण्यात येते.

**प्रवेशाच्या अटी :**

१. विद्यार्थी आदिवासी समाजाचा असावा.

२. मुला-मुलीस ३१ जुलैला ५ वर्षे पूर्ण झालेली असावीत.

३. जन्मतारखेचा दाखला आणि वडील / आईचे प्रतिज्ञापत्र असावे.

४. पहिली व्यतिरिक्त पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला.

**संपर्क :** संबंधित शासकीय आश्रमशाळांचे मुख्याध्यापक.

### *(२) स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य*

**उद्देश व स्वरूप :**

आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकरिता कार्यरत असलेल्या स्वेच्छा संस्थामार्फत स्थापन करण्यात आलेल्या आश्रमशाळांना १९५३-५४ पासून अनुदान देण्याची योजना राबविण्यात येत आहे.

या आश्रमशाळांत आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेष, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत उपलब्ध करून देण्यात येतात. त्याकरिता कर्मचाऱ्यांचे पगार व परीक्षणाकरिता विहित प्रमाणात अनुदान शासनाकडून देण्यात येते.

**प्रवेशाच्या अटी :**

शासकीय आश्रमशाळेत प्रवेशाकरिता असलेल्या सर्व अटी लागू.

**संपर्क :** संबंधित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक/ संस्था चालक

**अनुदानित आश्रमशाळेस मान्यतेकरिता अटी :**

१. संस्था नोंदणीकृत असली पाहिजे.

२. संस्थेची आर्थिक स्थिती, आदिवासी क्षेत्रातील कार्य इ.च्या माहितीसह अर्ज करणे आवश्यक

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

### *(३) आदर्श आश्रमशाळा*

**उद्देश व स्वरूप :**

शासकीय व स्वेच्छा संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळेतील हुशार आदिवासी विद्यार्थ्यांना निवडून अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकडे विशेष लक्ष देणे हा आदर्श आश्रमशाळेचा उद्देश. अशा आदर्श आश्रमशाळा १९९०-९१ मध्ये सुरू करण्यात आल्या आहेत.

या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, गणवेष, सर्व शैक्षणिक साहित्य, अंथरुण, पांघरुण, इ. पुरविण्यात येते.

**प्रवेशाच्या अटी :**

१. इ. ४ थी मध्ये शिकत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांतील; प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांतून गुणवत्तेनुसार प्रवेशाकरिता निवड.

**संपर्क :** स्पर्धा परीक्षेकरिता संबंधित शाळांचे मुख्याध्यापक / प्रकल्प अधिकारी

प्रवेशाकरिता संबंधित आदर्श आश्रमशाळेचे मुख्याध्यापक

### *(४) आदिवासी मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे*

**उद्देश व स्वरूप :**

दुर्गम व डोंगराळ प्रदेशातील आदिवासी होतकरू विद्यार्थ्यांना त्यांच्या गावाजवळ उच्च शिक्षण घेणे परवडत नसल्याने होतकरु विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात.

या वसतिगृहातील विद्यार्थी सर्वसाधारण शिक्षण संस्थात प्रवेश घेतात. शासकीय वसतिगृहात गुणवत्तेनुसार प्रवेश देऊन त्यांना निवास, भोजन,

अंथरूण, पांघरूण, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक व इतर आवश्यक साहित्य मोफत पुरविण्यात येते.

**प्रवेशाच्या अटी :**

१. अर्जदार आदिवासी व महाराष्ट्राचा रहिवासी असावा (इतर प्रवर्गांना विहित प्रमाणानुसार प्रवेश)

२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २४,०००/- पेक्षा कमी असावे.

३. विहित नमुन्यात शाळा सोडल्याचा व प्रवेश घेतल्याचा दाखला, गुणपत्रिका, जातीचा, उत्पन्नाचा व वर्तणुकीचा दाखला आणि फोटोसह अर्ज मुदतीत सादर केला पाहिजे.

**संपर्क :** संबंधित वसतिगृहाचे गृहपाल.

***(५) अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती***
**(भारत सरकार शिष्यवृत्ती)**

**उद्देश व स्वरूप :**

अनुसूचित जाती / जमातीच्या विद्यार्थ्यांना, शालांत परीक्षोत्तर उच्च शिक्षणाकरिता प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने व त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च भागविणे शक्य व्हावे म्हणून भारत सरकारद्वारा ही योजना राबविण्यात येते.

या योजनेअंतर्गत शिक्षणक्रमांची वर्गवारी करण्यात आली असून वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या व बहि:स्थ (अनिवासी) विद्यार्थ्याकरिता दरमहा (१० महिने) विद्यावेतनाचे खालीलप्रमाणे दर निश्चित केलेले आहेत.

| गट | अभ्यासक्रम | निवासी | अनिवासी |
|---|---|---|---|
| अ. | वैद्यकिय / अभियांत्रिकी | ४२५/- | १९०/- |
| ब. | तांत्रिक / आयुर्वेदिक / होमिओपॅथी | २९०/- | १९०/- |
| क. | अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र / वास्तुकला इ. | २९०/- | १९०/- |
| ड. | पदवीचे सामान्य अभ्यासक्रम | २३०/- | १२०/- |
| इ. | इ. ११ वी व १२ वी पदवी प्रथम वर्ष | १५०/- | ९०/- |

याशिवाय शैक्षणिक संस्थेचे शिक्षण विभागाने निश्चित केलेले शुल्क व सक्तीच्या पत्राद्वारे पाठ्यक्रमासाठी रु. ५००/- जादा पूरक भत्ता देण्यात येतो.

**पात्रतेच्या अटी :**

१. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.

२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ४४,५००/- पेक्षा कमी असावे.

३. नोकरी करीत नसावा.

४. एकाच कुटुंबातील फक्त २ मुलांना (परंतु सर्व मुली लाभ मिळणेस पात्र)

५. विहित नमुन्यात अर्ज केलेला असावा.

**संपर्क :** संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**टीप :** अनुसूचित जाती आणि भटक्या व विमुक्त जाती जमातींच्या विद्यार्थ्यांकरीता ही योजना समाज कल्याण विभागाकडून राबविण्यात येते.

### *(६) अनुसूचित जमातीच्याच विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणे - योजना*

**उद्देश व स्वरूप :**

कोणत्याही स्तरावर शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण घेता यावे व उत्पन्न मर्यादेमुळे भारत सरकार शिष्यवृत्तीसारख्या योजनांचा फायदा मिळू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराने मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची शिक्षण संस्थेस प्रतिपूर्ती करण्यात येते.

**पात्रतेच्या अटी :**

१. विद्यार्थी / विद्यार्थिनी आदिवासी असली पाहिजे.

२. शिक्षण संस्था प्रमुखांमार्फत विहित नमुन्यात प्रस्ताव संबंधित अधिकाऱ्याकडे पाठविला पाहिजे.

**संपर्क :**

१. इ. १ ली ते इ. १० शाळांच्या मुख्याध्यापकांमार्फत समाज कल्याण अधिकारी, जिल्हा प. ‌द,

२. महाविद्यालीन विद्यार्थी - प्राचार्यांमार्फत संबंधित प्रकल्प अधिकारी, ए. आ. वि. प्र.

### *(७) व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता देण्याची योजना*

**उद्देश व स्वरूप :**

उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वसाधारण शिक्षणक्रमापेक्षा जास्त खर्च येतो. त्यामुळे बरेच विद्यार्थी खर्चिक व्यावसायिक शिक्षणक्रम घेत नाहीत किंवा आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने मध्येच सोडून देतात. याकरिता आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या इतर आर्थिक सवलतीशिवाय व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणाऱ्या जादा खर्चाची तोंडमिळवणी करता यावी म्हणून दरमहा रु. १००/- दराने १० महिन्याच्या कालावधीकरिता हा जादा निर्वाह भत्ता देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

**पात्रतेच्या अटी :**

१. विद्यार्थी आदिवासी व महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

२. त्याने वैद्यकीय, अभियांत्रिकी, आयुर्वेदिक / होमिओपॅथी इ. व्यावसायिक मान्यताप्राप्त अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

३. त्याची वर्तणूक, हजेरी व प्रगती समाधानकारक असावी.

४. विहित प्रपत्रात जातीचे-नागरिकत्वाचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला इ. आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत अर्ज केलेला असावा.

**संपर्क :** संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

### (८) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना

**उद्देश व स्वरूप :**

आदिवासी समाजातील तरुणांमध्ये औद्योगिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या कमी असल्याने व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांना नोकरी व स्वयंरोजगारास जास्त वाव आहे. हे शिक्षणक्रम इ. ८ वी व १० वी नंतरचे परंतु पदवी / पदविका अभ्यासक्रम नसल्याने त्यांना इतर विद्यावेतनाच्या योजनांचा फायदा मिळू शकत नाही. परंतु सर्वसाधारण शिक्षणक्रमापेक्षा जास्त खर्च येतो, म्हणून औद्योगिक प्रशिक्षण घेण्यास आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते. ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १२,०००/- पेक्षा कमी आहे, अशा अनिवासी विद्यार्थ्यांना दरमहा रु. ६०/- व संस्थेतील निवासी विद्यार्थ्यांना दरमहा रु. १००/- दराने विद्यावेतन देण्यात येते.

**पात्रतेच्या अटी :**

१. विद्यार्थी आदिवासी व महाराष्ट्राच्या रहिवासी असावा.

२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १२,००० /- पेक्षा कमी असावे.

३. विद्यार्थ्याने संबंधित संस्था प्रमुखांकडे उत्पन्नाच्या दाखल्यासह अर्ज केला पाहिजे.

**संपर्क :** संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य.

## (ब) आर्थिक उन्नतीच्या योजना

### (१) अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना वीजपंप / तेलपंप पुरवठा योजना

**उद्देश व स्वरूप :**

आदिवासी शेतकऱ्यांजवळ सर्वसाधारणपणे अत्यंत कमी शेतजमीन असते. त्यामुळे वीजपंप / तेलपंप घेऊन ते आपले उत्पन्न वाढवू शकत नाहीत, म्हणून दीड ते सोळा एकर शेतजमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर नाममात्र सहभागाने वीजपंप / तेलपंपाचा पुरवठा करण्याची योजना राबविण्यात येते.

**पात्रतेच्या अटी :**

१. अर्जदार आदिवासी आणि महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

२. अर्जदाराजवळ स्वत:ची दीड ते सोळा एकर मर्यादित शेतजमीन असावी.

३. नदी, नाला, विहिर इ. पासून कमीत कमी ६ महिने पाणी उपलब्ध असावे.

४. म. रा. वि. मं. ने वीज पुरवठा देण्याचे प्रमाणित केले असावे. (वीज पुरवठा नसल्यास तेलपंप)

५. आर्थिक सहभाग - १० एकर पर्यंत - रु. २५० / - १० ते १६ एकर - रु. ५००/-

६. ७/१२ चतु:सीमा व खाते उतारा, म. रा. वि. मं. ए-१ फॉर्म व करारनाम्यासह अर्ज.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

### *(१०) अनुसूचित जमातीच्या लोकांना घरावरील गवती छपराऐवजी मंगलोरी कौले किंवा पन्हाळी पत्रे टाकण्याकरिता अर्थसहाय्य योजना.*

**उद्देश व स्वरूप :**

दुर्गम व डोंगराळ प्रदेशात राहणारे आदिवासी पूर्वापार गवती छपरांच्या झोपड्या / घरात राहतात. पावसाळा व हिवाळ्यात या झोपड्यात राहणे कष्टप्रद असते. थंडी वाऱ्यापासून संरक्षणही होत नाही. गवती छपरांच्या घरांना आग इ. पासूनही धोका संभवतो. याकरिता आदिवासींच्या गवती छपरे असलेल्या घरावर गवती छपरांऐवजी मंगलोरी कौले / पन्हाळी पत्रे पुरवून त्यांना चांगला निवारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १९८५-८६ पासून ही योजना राबविण्यात येत आहे.

योजनेत मंगलौरी कौले / पन्हाळी पत्रे व आवश्यक ते लाकडी साहित्य रु. ४०००/- मर्यादिपर्यंत १०० टक्के अनुदानाच्या स्वरूपात देण्यात येते.

**पात्रतेच्या अटी :**

१. संबंधित व्यक्ती आदिवासी समाजाचा असावा.

२. स्वत:चे गवती छपराचे घर असावे.

**संपर्क :** संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांच्यामार्फत गट विकास अधिकारी व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

### *(११) केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) - योजना*

**उद्देश व स्वरूप :**

आदिवासींच्या विकासाकरिता शासनाद्वारे अनेक योजना राबविण्यात येत असल्या तरी स्थानिक गरजा लक्षात घेऊन, नियमित योजनेद्वारे जो लाभ आवश्यक असूनही आदिवासींना देता येत नाही. अशा प्रकारचा लाभ देण्याकरिता लहान लहान नाविन्यपूर्ण संकल्पना / योजना तयार करून, शासनाची मंजुरी घेण्याच्या नियमित प्रक्रियेस लागणारा विलंब टाळून, त्वरीत मंजूर करून, आदिवासींना लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत (न्युक्लिअस बजेट) तरतूद सर्व प्रकल्पांना उपलब्ध करून देण्यात येते. विभागीय पातळीवर नेमण्यात आलेल्या निर्देश समितीद्वारे या योजनांना मंजुरी देण्यात येते.

स्थानिक गरजेवर आधारित नियमित योजनांतर्गत देण्यात येणाऱ्या लाभापेक्षा वेगळ्या संकल्पनेवर आधारीत आर्थिक उत्पन्नवाढ, प्रशिक्षण, मानव साधन संपत्ती विकास व कल्याणात्मक योजनांकरिता एका कुटुंबाकरिता जास्तीत जास्त रु. १०,०००/- पर्यंत शासनाने ठरवून दिलेल्या वर्गवारीनुसार ५० ते १०० टक्के पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते.

**पात्रतेच्या अटी :**

प्रत्येकप्रकल्पातील परिस्थितीनुसार राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अटी अर्थसहाय्याचे स्वरूप इ. निर्देश समितीद्वारे निश्चित करण्यात येते.

संपर्क : प्रकल्पात राबविण्यात येणाऱ्या योजना, त्यांच्या अटी, आर्थिक सहाय्याचे स्वरूप इ. बाबत संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

### *(१२) मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र - योजना*

**उद्देश व स्वरूप :**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ इ. मध्ये अनु. जमातीच्या वाहन चालकांच्या मोठ्या प्रमाणवारील अनुशेष लक्षात घेऊन आदिवासी तरुणांना हे प्रशिक्षण देऊन नोकऱ्या मिळवून देणे हा मुख्य उद्देश. या केंद्रामध्ये उमेदवारांना मोफत निवास व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आणि भोजन इत्यादी खर्चाकरिता रुपये ४५०/- दरमहा विद्यावेतन दिले जाते. (केंद्रे - पांढरकवडा, जि. यवतमाळ, गडचिरोली, जि. गडचिरोली, चंद्रपूर; जि. चंद्रपूर व शहादा, जि. धुळे)

**पात्रतेच्या अटी :**

१. उमेदवार आदिवासी असावा.

२. वय- २३ ते २५ वर्षे, उंची किमान १६३ सें. मी., शिक्षण ७ वी उत्तीर्ण.

३. उमेदवार शारिरीक व मानसिक दृष्ट्या वाहन चालकाचे काम करण्यास सक्षम असावा.

४. अवजड वाहन चालविण्याचा परवाना व कमीत कमी दोन वर्षाचा अवजड वाहन चालविण्याचा अनुभव.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

### *(१३) आदिवासी युवकांना पोलीस व लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण योजना*

**उद्देश व स्वरूप :**

सैन्यदल, राज्यातील पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल, औद्योगिक सुरक्षा दल व इतर संरक्षण दले इत्यादीमध्ये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचा मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे. आदिवासी युवक काटक, साहसी व शारिरीकदृष्ट्या सक्षम असल्याने त्यांना वरील दलांमध्ये नोकरीच्या मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन, प्रशिक्षण व या दलात भरती होण्याकरिता आवश्यक असलेली लेखी चाचणी इत्यादी संबंधी माहिती नसल्याने या संधीचा फायदा ते घेऊ शकत नाहीत. याकरिता सुदृढ व पात्र आदिवासी युवकांना योग्य ते शिक्षण व प्रशिक्षण देऊन अशा दलांमध्ये नाकेरी मिळण्याच्या दृष्टीने तयार करणे व प्रोत्साहित करणे हा या प्रशिक्षण केंद्राचा उद्देश आहे.

महाराष्ट्रात असे प्रशिक्षण देणारी ९ केंद्रे या विभागामार्फत स्थापन करण्यात आलेली आहेत. (१) अकोले, जि. अहमदनगर, (२) नाशिक, जि. नाशिक, (३) नंदूरबार, जि. नंदूरबार (४) धारणी, जि. अमरावती (५) किनवट, जि. नांदेड (६) गडचिरोली, जि. गडचिरोली, (७) देवरी, जि. भंडारा (८) जव्हार, जि. ठाणे (९) आंबेगाव, जि. पुणे

या केंद्रात तीन महिन्याच्या प्रशिक्षणाकरिता एका गटात ५० उमेदवारांना प्रवेश दिला जातो. तसेच मोफत निवास, शारिरीकदृष्ट्या सुदृढ होण्याच्या दृष्टीने सकस भोजन, आवश्यक गणवेष, प्रशिक्षणाकरिता आवश्यक इतर साधने व प्रशिक्षण मोफत देण्यात येते.

**पात्रतेच्या अटी :**

१. उमेदवार आदिवासी असावा.

२. विविध दलात भरतीकरिता आवश्यक पात्रता धारण करीत असावा.

३. वय किमान १८ वर्षे असावे.

**संपर्क :** संबंधित केंद्राचे प्रभारी प्रमुख व आपल्या प्रकल्प क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

टीप - ज्या जिल्ह्यात केंद्र नाही अशा जिल्ह्यातील युवकांना त्या क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी जवळच्या इतर केंद्रकाडे प्रशिक्षणाकरिता पाठवू शकतात.

***(१४) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र - योजना***

**उद्देश व स्वरूप :**

आदिवासी युवकांकरिता स्थानिक गरजांवर आधारित लहान लहान प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवून त्यांना स्वयंरोजगाराची संधी देणे तसेच आदिवासी भागातील लोकांना अत्यंत गरजेची यंत्रे व अवजारे स्थानिकरित्या दुरुस्त करून घेण्याच्या दृष्टीने कुशल कारागीर उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

ही व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे सध्या ४ निवासी पोस्ट बेसिक आश्रमशाळांमध्ये उघडण्यात येणार आहेत. यात इलेक्ट्रिशिअन, ऑइल इंजिन / इलेक्ट्रिक मोटार दुरुस्ती मोटार मेकॅनिक इ. अभ्यासक्रम शिकविले जातील. प्रशिक्षणाचा कालावधी ४ महिने असतो. एका सत्रात ५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. प्रशिक्षणार्थींच्या इच्छेनुसार ३ प्रकारच्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण त्याला घेता येते.

**पात्रतेच्या अटी :**

प्रशिक्षणार्थी अनुसूचित जमातीचा असावा व ९ वी पर्यंत शिक्षण झालेले असावे.

**संपर्क :** संबंधित पोस्ट बेसिक आश्रमशाळांचे मुख्याध्यापक व संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी.

(केंद्र - शासकीय पोस्ट बेसिक आश्रमशाळा (१) कोटगूल, ता. कोरची व (२) कसनसूर ता. भामरागड, जि. गडचिरोली (३) विनवळ, ता. जव्हार, जि. ठाणे आणि (४) पाथरज ता. कर्जत, जि. रायगड)

***(१५) स्वयंरोजगारासाठी वाहन खरेदीकरीता कर्जपुरवठा - योजना***

**उद्देश व स्वरूप :**

आदिवासी बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने स्वतःचे वाहन खरेदीकरीता अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे, ही योजना एन. एस. एफ. डी. सी. नवी दिल्ली या राष्ट्रीय स्तरावरील वित्तीय व विकास संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येते.

या योजनेअंतर्गत ९० टक्के रक्कम कर्जरुपाने (६ टक्के सरळव्याज), १० टक्के रकमेपर्यंत वैयक्तिक सहभाग भरल्यास मिळू शकते.

**पात्रतेच्या अटी :**

१. अर्जदार आदिवासी असावा.

२. अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रुपये २२,०००/- पर्यंत असावे.

३. अर्जदाराचे वय - १८ ते ४० वर्षांचे मर्यादेत असावे.

४. अर्जदाराजवळ व्यवसायाकरिता आवश्यक तो वाहन / व्यवसाय परवाना व जागा उपलब्ध असावी.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ.

## (क) इतर योजना

### *(१७) मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य - योजना*

**उद्देश व स्वरूप :**

ही योजना अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त व भटक्या जाती जमाती यांच्याकरीता मूळच्या समाज कल्याण विभागाने सुरू केली. ही पीडब्ल्यूआर-२१९ या नावाने ओळखली जाणारी योजना आहे. अनुसूचित जमातीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना आदिवासी विकास विभागामार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. मागासवर्गीयांना महापालिका, नगरपालिका व ग्रामीण क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापून चांगल्या प्रकारची निवासस्थाने उपलब्ध करून देणे हा योजनेचा उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत महानगरपालिका क्षेत्र आणि 'अ' व 'ब' वर्ग नगरपालिकांचे क्षेत्र तसेच 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्र आणि ग्रामीण क्षेत्र असे दोन भाग करण्यात आलेले असून शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या क्षेत्रवार कमाल मर्यादेपर्यंत बिनव्याजी कर्ज व अनुदान उपलब्ध करून दिले जाते. त्याचप्रमाणे शासकीय जागा किंवा खरेदी करावयाच्या जागेची नगररचना विभागाने ठरविलेली किंमतही अर्थसहाय्याच्या स्वरूपात देण्यात येते.

**पात्रतेच्या अटी :**

१. सभासद अनुसूचित जमातीचा असावा. (एकूण सभासद संख्येच्या १० टक्के सदस्य आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील असतील.)

२.अ) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी कुटुंबाचे सर्व मार्गांनी वार्षिक उत्पन्नमर्यादा जास्तीत जास्त रुपये ८,४००/-

ब) अल्प उत्पन्न गटातील सदस्यांच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न मर्यादा जास्तीत जास्त रुपये १८,०००/-

३. संस्था महाराष्ट्र सहकारी कायद्याअंतर्गत पंजीबद्ध असली पाहिजे.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

### *(१८) खावटी कर्ज - योजना*

**उद्देश व स्वरूप :**

महाराष्ट्र राज्य आदिवासींच्या आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियम १९७६ चे तरतुदीनुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विशिष्ट घटकाकडून आदिवासी बांधवांची होणारी परंपरागत आर्थिक पिळवणूक व शोषण थांबविण्याकरिता व ऐन पावसाळ्यात उपासमार होऊ नये म्हणून शेतमजूर व अल्पभूधारकांच्या ४ युनिट पर्यंतच्या कुटुंबांना प्रत्येकी

रु. ४००/-, ८ युनिट पर्यंतच्या कुटुंबांना प्रत्येकी रु. ८००/- व त्यावरील कुटुंबांना प्रत्येकी रु. १०००- अशा सुधारीत दराने खावटी कर्ज वाटप करण्यात येते. यामध्ये ९० टक्के धान्य रुपाने व १० टक्के रोख स्वरूपात लाभ देण्यात येतो.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे उप प्रादेशिक व प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ.

### *(१९) धान्य कोष योजना*

**उद्देश व स्वरूप :**

शासनाद्वारे राबविण्यात येत असलेल्या खावटी कर्ज योजनेला पर्याय म्हणून धान्य कोष योजना १९९५ पासून सुरू करण्यात आली आहे. खावटी कर्ज योजनेत वसूली होत नसल्याने शासनावर पडत असलेला बोजा कमी होऊन शासनाची आर्थिक बचत व्हावी व धान्य कोष योजनेद्वारे आदिवासी भागातील गावकऱ्यांमध्ये अन्नधान्याच्या संदर्भात आत्मनिर्भरता निर्माण व्हावी हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रात ३-४ गावांच्या समूहाकरिता (५० ते ५००) कुटुंबे परिसरातील सेवाभावी संस्था / सहकारी संस्था / ग्रामपंचायत यांच्या मदतीने नाममात्र रु. ५ ते १० प्रवेश शुल्क घेऊन (आदिवासी व इतर सर्वांकरिता) धान्य कोष स्थापन करणे व त्याद्वारे कुटुंबांना आवश्यक तेव्हा गरजेनुसार धान्य उपलब्ध करून देणे. आणि १०५ ते ११५ टक्के पर्यंत हंगामानंतर धान्य रूपाने / रोखीने फेड करणे व चक्र सुरू ठेवणे असे या योजनेचे स्वरूप आहे. धान्य कोषाचे सभासद असलेले भूधारक कुटुंब ५० ते १०० किलो (१ / ३ हिस्सा) धान्य रूपाने व भूमिहीन कुटुंब रोखीने वर्गणी देऊ शकते. आदिवासी सभासदांच्या जमा धान्य साठ्याच्या २/३ हिस्सा शासनाद्वारे आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून देण्यात येतो. धान्य साठवणूकीच्या व्यवस्थेकरिता व तराजू, काटे इत्यादीकरीता रु. ३०००/- चे अर्थसहाय्य देण्यात येते.

**संपर्क :** (१) संबंधित धान्य कोष व्यवस्थापन संस्था.

(२) धान्य कोष स्थापनेकरिता संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

### *(२०) अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी*

**उद्देश व स्वरूप :**

अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नाव नोंदणी सेवायोजन कार्यालयात करण्यात येत होती. परंतु या उमेदवारांना संधी मिळण्यास फार विलंब होता हे लक्षात घेऊन शासनाने मागासवर्गीयांच्या नांव नोंदणीचे काम समाज कल्याण विभागावर सोपविले. १९८४-८५ मध्ये आदिवासी विकास विभाग स्वतंत्र झाल्यानंतर हे काम प्रकल्प कार्यालयांकडे सोपविण्यात आले. गरजू, सुशिक्षित अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नावे नोंदवून ती विविध भरती अधिकाऱ्यांकडे शिफारस करून पाठविणे व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

***(२१) आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना / संस्थांना आदिवासी सेवक / सेवा संस्था पुरस्कार योजना.***

**उद्देश व स्वरूप :**

आदिवासी क्षेत्रात आदिवासींच्या विकासाकरिता उस्फूर्तपणे काम करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था आहेत. त्यातील उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांची निवड करून त्यांच्या कार्याचा जाहीर गौरव करून असे काम करण्याकरिता इतर व्यक्ती व संस्थांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने आदिवासी सेवक / आदिवासी सेवा संस्था पुरस्कार देण्याची योजना १९८५ पासून कार्यान्वित करण्यात आली. हा पुरस्कार, प्रतिवर्षी परमपूज्य ठक्करबाप्पा यांच्या जयंतीदिनी (२९ नोव्हेंबर), निवड झालेल्या व्यक्ती / संस्थांना देण्यात येतो.

**या पुरस्काराचे स्वरूप :**

१) आदिवासी सेवक रु. १०,००१/- रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्रक व सत्कार

२) सेवा संस्था - रु. २५,००१/- रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्रक व संस्थेच्या प्रमुखाचा सत्कार

**पात्रतेच्या अटी :**

१. अर्जदाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असावे.

२. अर्जदार खासदार / आमदार / जिल्हा परिषद अध्यक्ष अथवा कोणत्याही अधिकार पदावर नसावा.

३. अर्जदार / स्वयंसेवी संस्था राजकारणापासून अलिप्त असावा.

४. अर्जदार व्यक्ती वा संस्था यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे नोंदविलेले नसावेत किंवा शिक्षा झालेली नसावी.

५. पुरस्कारार्थींनी आदिवासी संस्कृती, संवर्धन, शिक्षण, अत्याचार निर्मूलन, अंधश्रध्दा निर्मूलन इ. प्रकारच्या क्षेत्रात आदिवासींच्या विकासाकरीता किमान १० वर्षे विशेष भरीव कार्य केलेले असावे.

६. अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज त्यांनी केलेल्या कार्याबद्दलच्या माहितीसह (संस्थांच्या बाबतीत संस्था पब्लिक ट्रस्ट / सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट खाली पंजीबध्द असल्याबाबतची प्रमाणपत्रे, घटनेची प्रत व मागील ५ वर्षाचे अहवाल) पाठविणे आवश्यक.

संपर्क :

संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,

जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

***(२२) आदिवासी हस्तकला प्रदर्शन***

**उद्देश व स्वरूप :**

आदिवासी हस्तकला वस्तुंना नागरी भागात मोठ्या प्रमाणावर बाजारपेठ उपलब्ध असल्यामुळे दुर्गम भागात राहणारे आदिवासी व नागरी भागातील ग्राहक यांना एकत्रित आणून आदिवासींनी हस्तकलेने तयार केलेल्या वस्तु प्रदर्शित करुन त्यांच्या विक्रीद्वारे या कलाकारांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत प्रदर्शनात भाग घेणाऱ्या आदिवासी हस्तकलाकारांना जाण्या-येण्याचा खर्च, प्रदर्शन काळातील भत्ता, त्यांनी तयार केलेल्या वस्तुंचा प्रदर्शन स्थळापर्यंतच्या वाहतूकीचा खर्च, अर्थसहाय्याच्या स्वरुपात देण्यात येतो. त्याचप्रमाणे प्रदर्शनाच्या व्यवस्थापनाचा संपूर्ण खर्च शासनाकडून करण्यात येतो.

**पात्रतेच्या अटी :**

१. हस्तकलाकार आदिवासी असला पाहिजे.

२. त्याने प्रदर्शनात भाग घेण्याची तयारी दाखविली पाहिजे.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

### *(१३) आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा*

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी जमातीनुरुप नृत्यांचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत. आदिवासींची ही स्वत:ची संस्कृती जतन करण्याच्या दृष्टीने व या नृत्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ही योजना तयार करण्यात आलेली आहे. या योजनेत विविध जमातींच्या नृत्यपथकांच्या स्पर्धा घेण्यात येतात. या स्पर्धांकरिता नृत्य कलाकारांना त्यांच्या गांवापासून स्पर्धांच्या गावापर्यंत जाण्या-येण्याचा खर्च, हजेरी भत्ता, तसेच पारंपारिक वेष व वाद्यांसाठी अनुदान देण्यात येते. तसेच स्पर्धा आयोजनाचा खर्चही शासनाकडून केला जातो.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

### *(१४) वारली चित्रकला स्पर्धा - योजना*

**उद्‌देश व स्वरूप :**

ठाणे जिल्ह्यातील वारली या अनुसूचित जमातीच्या पारंपारिक भित्ती चित्रांना व त्यांच्या चित्रकलेस जगभर मान्यता मिळालेली आहे. या चित्रकलेचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने प्रौढ गट व शालेय गट असे दोन गट करुन दरवर्षी स्पर्धा घेण्यात येतात व त्यातील गुणवत्तेनुसार येणाऱ्या पहिल्या ३१ निवडक चित्रांना बक्षिसे देण्यात येतात.

**पात्रतेच्या अटी :**

१. स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांस वारली चित्रकला येत असावी.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

### *(१५) आदिवासी युवकांकरिता नेतृत्व प्रशिक्षण व स्पर्धापूर्व प्रशिक्षण योजना*

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी भागातील सुशिक्षित तरुणांना आदिवासी विकासाच्या विविध योजनांची तसेच समाजाचे नेतृत्व करण्याकरिता, आवश्यक त्या बाबींचे प्रशिक्षण आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे आयोजित करण्यात येते. त्याचप्रमाणे महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या / पूर्ण झालेल्या

आदिवासी तरुणांकरिता विविध स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, त्याकरिता असलेला अभ्यासक्रम / स्पर्धा परीक्षांचे स्वरुप, स्पर्धा परीक्षांना आवश्यक असणाऱ्या पात्रता इत्यादीबाबत प्रशिक्षणाद्वारे माहिती देऊन त्यांना स्पर्धा परीक्षांकरिता तयार करणे हा या प्रशिक्षणाचा उद्देश. या योजनेअंतर्गत मोफत निवास व भोजन पुरविण्यात येते व प्रशिक्षणाचा खर्च शासनाकडून करण्यात येतो.

**पात्रतेच्या अटी :**

१. प्रशिक्षणार्थी आदिवासी असावा.

२. प्रशिक्षणार्थींचे आवश्यक ते शिक्षण झालेले असावे.

३. प्रशिक्षणार्थींचे नांव प्रकल्प अधिकाऱ्यांनी संस्थेकडे पाठविलेले असावे.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

## आदिवासी विकास विभागाकडून देण्यात येणाऱ्या तरतुदीतून विविध विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या काही महत्वाच्या योजना

| अ. क्र. | योजनेचे नांव | अटी | कोणाशी संपर्क साधावा |
|---|---|---|---|
| १. | आदिवासी शेतकऱ्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी अर्थसहाय्य (ऊस लागवडीकरिता द्यावयाच्या सहाय्यासह) | १. वार्षिक उत्पन्न रु. ६४००/- च्या आत असावे. २. स्वत:ची ६ हेक्टर जमीन असणे आवश्यक | कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद |
| २. | आदिवासींना मिनीकिट वाटप | १. लाभधारक अल्प/अतिअल्प भूधारक असावा. २. लाभधारक अनुसूचित जमातीचा असावा. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती/ कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद |
| ३. | नवीन विहिरींसाठी अर्थसहाय्य | १. लाभधारक दारिद्रय रेषेखालील व अल्पभूधारक असावा. | गट विकास अधिकारी पंचायत समिती/कृषि विकास अधिकारी |

| अ. क्र. | योजनेचे नांव | अटी | कोणाशी संपर्क साधावा |
|---|---|---|---|
| ४. | पशुवैद्यकीय महाविद्यालयातील आदिवासींना विद्यावेतन देणे | १. आदिवासी उपयोजनेतील आणि १२ वी परीक्षा गणित, विज्ञान, जीवशास्त्र विषय घेऊन उत्तीर्ण झालेला पाहिजे. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेमार्फत प्रादेशिक पशुसंवर्धन सहसंचालक |
| ५. | तलंगाचे गटवाटप | १. लाभधारक दारिद्रय रेषेखालील कार्डधारक असावा. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद |
| ६. | दुधाळ संकरित गाईचे वाटप | आदिवासी लाभधारकांना जनावरांच्या किंमतीच्या ५०% किंवा रु. १५००/- खरेदी अनुदान देण्यात येते. | जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी |
| ७. | शेळ्यांचे गट वाटप | लाभधारक दारिद्रय रेषेखालील कार्डधारक असावा | पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद |
| ८. | भाकड, गाभण, म्हशीचा पुरवठा (वाहतूक व पोषण). | लाभधारक आदिवासी संस्थेचा सभासद असावा | जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी |
| ९. | दुधाळ जनावरे/देशी गाईंचा पुरवठा | लाभधारक दारिद्रय रेषेखालील कार्डधारक असावा | जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी |
| १०. | संकरित गाईचा पुरवठा | लाभधारक दारिद्रयरेषेखालील कार्डधारक व अल्प भू-धारक असावा. | जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, सहायक संचालक, पशुसंवर्धन |
| ११. | मत्स्य व्यवसाय उपयोगी आवश्यक सामुग्रीच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य | लाभधारक मच्छिमार सहकारी संस्थेचा सभासद असावा. | जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी |
| १२. | अनुसूचित जमातीच्या व सीमांतक शेतकऱ्यांच्या जमिनीवर वनीकरण | सदर योजना निवडक पाणलोट क्षेत्रातील खाजगी पडीत जमिनीवरील वनीकरणाच्या योजनेत विलीन करण्यात आली आहे. | संबंधित जिल्ह्याचे उपसंचालक सामाजिक वनीकरण |

| अ. क्र. | योजनेचे नांव | अटी | कोणाशी संपर्क साधावा |
|---|---|---|---|
| १३. | आदिवासी मुलींना उपस्थिती भत्ता | १. पालक दारिद्रय रेषेखालील असावा<br>२. इ. १ ली ते इ. ४ थी मधील विद्यार्थीनीनी शाळेत उपस्थित राहणे आवश्यक | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद |
| १४. | सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता | १. लाभधारक अनुसूचित जमातीचा असावा.<br>२. रु. १२०००/- पेक्षा वार्षिक उत्पन्न जास्त नसावे. | शिक्षणाधिकारी / समाज कल्याण अधिकारी |
| १५. | दारिद्रय रेषेखालील लोकांना जनता साडी / धोतीचे वाटप | १. लाभधारक आदिवासी असावा.<br>२. लाभधारक दारिद्रय रेषेखालील कार्डधारक असावा | गट विकास अधिकारी |
| १६. | मातृत्व अनुदान | १. लाभधारक माहिला ही आदिवासी असावी<br>२. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असावी | प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र / कुटीर रुग्णालय |

टीप : ★ योजनेच्या अटी, अर्थसहाय्याचे स्वरुप, अंमलबजावणी अधिकारी यांचेत वेळोवेळी परिस्थितीनुरुप बदल होऊ शकतो.

★★ अर्जांचे नमुने संपर्क अधिकाऱ्यांच्याकडे उपलब्ध.

*(आदिवासी विकास विभाग,*
*महाराष्ट्र राज्य यांच्या सौजन्याने)*

# आदिवासी जमातींमध्ये सोयरसंबंध : कृतीची गरज

- सुनिल कुमरे

जातीभेद हा भारताला शाप असून जातीजातीमधील विभागलेल्या समाजव्यवस्थेमुळे भारताचे अतोनात नुकसान झाले आहे. जातीभेदाच्या वरवंट्यात दबलेल्या आपल्या समाजाला स्थैर्य देण्याच एकमेव उपाय म्हणजे 'आंतरजातीय विवाह' सार्वत्रिकरित्या होणे. आंतरजातीय विवाहाचे लोण उच्चभ्रू समाजापासून उपेक्षित, खालच्या मानल्या गेलेल्या समाजापर्यंत धडकले याला आदिवासी समाजही अपवाद नाही. नागरीकरण आणि शहरीकरणाच्या प्रवाहात सुशिक्षित आदिवासी तरूणदेखील आंतरजातीय विवाहाचे समर्थन करताना दिसतो. त्यावेळी तो समाजाचे नैतिक नुकसानच करतो. समाजापासून तो दुरावला जातो.

महाराष्ट्रात आदिवासींच्या एकूण ४७ जमाती आहेत. ह्या उपजमातीत राजगोंड, गोंड, परधान, बुरूड, भिल्ल, कोलाम अशी सामजिक उतरंड तटस्थपणे नांदताना दिसते. एकमेकांविषयीची उच्च-नीचतेची भावना अद्यापही मूळ धरून आहे. आदिवासींच्या आत्मसन्मान आणि अस्तित्वाच्या लढाईत तसेच सामाजिक, राजकिय संघटन होण्यास उपजमाती विषमता प्रमुख अडसर आहे हे सत्य डावलता येत नाही. ..दिवासींच्या सामाजिक जाणीवेच्या नवयुवकांनी, साहित्यिकांनी, समाजसुधारकांनी ही उतरंड नाकारून उपजमातींमध्ये विवाह घडवून आणण्यासाठी व्यापक चळवळ उभारली तर यशाचं कोणतेही शिखर गाठायला आदिवासी मागे राहणार नाही हे निश्चित. अशा प्रकारच्या विवाहाला विरोध विशेषत: आदिवासीतील स्वत:ला श्रेष्ठ कुळातले समजणारे जमाती करतात. उघड-उघड विरोध करीत नसले तरी समर्थनही करीत नाही. अशा जमातीने मात्र पुढील विषयाला चाचपून पाहावे आणि आपला निर्णय ठरवावा. एवढीच अपेक्षा हा प्रपंच मांडण्यासाठी !

आदिवासी म्हणजे अनेक उपजमातींचा समूह ! प्रादेशिक भिन्नता वगळल्यास सारे काही एकाच सुत्रात बांधलेले जीवन. आदिवासींच्या एकसंघतेसाठी ह्या सर्व उपजमातींमध्ये सोयरबंधाचा मार्ग प्रभावी आहे, नव्हे ती काळाची गरज आहे. आदिवासीत अनेक प्रथा - परंपरा आहेत याची तो प्राणपणाने जोपासना करतो. त्याचपैकी गोत्रावर आधारित विवाहपद्धती ! जुन्या काळात, कधी चांगल्या हेतुने, चांगल्या परिणामासाठी ही गोत्र पद्धती अमलात आणली असली तरी तिचे दुष्परिणाम आदिवासींच्या संदर्भात दिसून येतात हे श्री. व्यंकटेशराव आत्रामांनी हेरले. त्यांनी ह्या विषयाचा सखोल अभ्यास केला. मनन, चिंतन केले. लेख लिहिले व सिद्ध केले की, आदिवासींमधील

गोत्रपद्धतीचा त्याग आदिवासींच्या हिताचा आहे. विचारापुरते ठीक असले तरी कृती होणे कठीण. आदिवासींना पटविणे मुश्कील ! अशाही अवस्थेत आत्रामांनी कृती आचारली. आदिवासींच्या गोत्रपद्धतीच्या काठिण्यामुळे योग्य तरूण - तरूणींचे लग्न जुळविणे जिकरीचे ठरते. योग्य वधु-वर न मिळाल्यास अनैतिकता वाढू शकते. परजातीत विवाह करणे, परजातीतील तरूण-तरूणींचा हात धरून पळून जाणे अशा सारख्या गोष्टी घडू शकतात. ज्या घरी असे घडते ते घर वाळीत पडते. जन्मभरासाठी त्या घराला, तरूण-तरूणींना मनस्वी छळ सोसावा लागतो. अशी घरेच्या घरे सामाजिक छळाचे बळी ठरतात. या पार्श्वभूमीवर स्वगोत्र विवाह पद्धतीस मान्यता देणे आदिवासींपुरते तरी अपरिहार्य ठरते. याच दृष्टीने व्यंकटेशरावांनी यशोधा उईके या स्वगोत्रीय (सहा कुळातील) कुमारीकेशी विवाह केला. श्री. व्यंकटेशराव एम. ए. तर सौ. आत्राम ह्या मॅट्रिक होत्या ('गजरा' - डॉ. भाऊ मांडवकर)

श्री. आत्राम व यशोधा उईके हे दोघेही ६ देव गोत्राचे. आदिवासी गोत्र परंपरेनुसार बहिण-भाऊ ठरतात. परंतु आत्रामांनी हे जाणीवपूर्वक केले. हे योग्य आहे काय ? त्यांची ही भूमिका आदिवासींनी मान्य करावी काय ? अर्थात असे करणे म्हणजे आपल्या चांगल्या सांस्कृतिक प्रथेवर घाव घातल्यासारखे आहे. याला आदिवासी समाज मान्यता देणार नाही. जर व्यंकटेश आत्रामांचा निर्णय चुकीचा होता हे जर आपण मानत असू तर होत असलेल्या दुष्परिणामाला आळा घालण्याचा उपाय आपल्यालाच ठरवावा लागेल. अन्यथा आपला ऱ्हास थांबविण्यास आपण असमर्थ ठरू हे मान्य करावे लागेल. कारण गोत्रपद्धतीमुळे अलिकडे दुष्परिणामाची अनेक उदाहरणे सापडतील. काही महाभागांनी तर नैताम-नैताम, आत्राम-आत्राम अशा एकाच गोत्रात विवाह करून आत्रामांच्याही पुढे निघुन गेले आहेत. व्यंकटेश आत्रामांचा वरील निर्णय जरी आपण चुकीचा मानला तरी ते मात्र आदिवासींमधील उपजमातींमध्ये विवाह संबंध करण्याच्या विचारांचे पुरस्कर्ते होते हे विसरून चालणार नाही. हे स्वप्न अधुरेच राहणार हे कदाचित त्यांनी ओळखले असावे म्हणून त्यांनी इतर दुष्परिणाम टाळण्यासाठी स्वगोत्र विवाह पद्धतीचा पर्याय दिला असावा.


अशाच गोत्रीय प्रश्नापैकी मावसगोत्राचा प्रश्न उभारून विवाह नाकारला जातो. ह्या प्रश्नांचा आपल्याला नव्याने विचार करावा लागणार आहे. उदा. ५ देव आणि ७ देव हे मावसगोत्र समजून विवाह टाळतात. खरे तर 'देव गोत्राला प्रदेव सोडून ४, ६, ७ देव गोत्रांशी देवाण-घेवाण करण्याची रूढी आहेच. परंतु हा नवीनच मावसगोत्र अलीकडे निर्माण झाल्याचे दिसते. सख्ख्या मावशीचा मावसगोत्र मान्य करता येईल परंतु जिथे कोणताच रक्तसंबंध जुळत नाही किंवा नातेसंबंध लांबचा आहे तिथे असा विवाहसंबंध जोडण्यात अडचण कोणती ? यापूर्वी अशाप्रकारचे कित्येक विवाह झाले आहेत. अशा प्रकारच्या प्रश्नांना वेळीच प्रतिबंध घालणे आवश्यक आहे.

काही विद्वान सामाजिक सुधारणांच्या नावाखाली इतर गैर आदिवासी समुदायाशी विवाहबद्ध होतात. एक तर आदिवासी जमातींकडे पाहण्याचा इतरांचा दृष्टिकोन हीन आहे. किंवा आपल्या अस्तित्वाची जाणीव नसल्यामुळे तसेच इतर चळवळींच्या प्रभावी धोरणामुळे विशेषत: शिकलेल्या समुदायाने हे कृत्य केले. दुसरे म्हणजे आधुनिकतेच्या कैफात हे घडत असावे. परंतु दुसऱ्याच्या तुप-रोटीपेक्षा स्वत:ची चटणी-भाकर सरस हा स्वाभिमान योग्य नव्हे का ? सुशिक्षितांनी जर समाजापासून अशी पाठ फिरविली तर अज्ञान, अशिक्षित, दारिद्रयात गुरफटलेल्यांनी कुणाकडे पाहावे ?

उपजमातीय सोयरसंबंध किती जिकरीचे आहे हे आदिवासी समाजाने ओळखावे. यावर आजपर्यंत बऱ्याच समाजधुरीणांनी प्रयत्न केले, काही केवळ बोलत राहिले. परंतु प्रत्येक समाजहितकाने या गोष्टीचा पुरस्कार केला. ज्यांना पचले नाही ते आदिवासींचे शत्रूच ! जे करू शकले नाहीत. त्यांना सामाजिक तणावाने वैफल्यग्रस्त केले. परंतु सामाजिक मनाच्या कानोश्यात त्यांनी आयुष्यभर हा प्रश्न सतत पेटत ठेवला हे विसरून चालणार नाही.

दि. ११, १२ जाने. १९९७ ला आदिवासी प्रबोधन मंच, गडचिरोली द्वारा विदर्भ स्तरीय आदिवासी युवक संमेलनात 'आदिवासीतील आंतरजाती भेद : एकतेतील आणि विकासातील मुख्य अडचण'' या विषयावर परिसंवाद आयोजित करून भविष्यातील मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला गेला. तर प्रा. वामन शेळमाके, प्रा. हरिश्चंद्र सलामे, पितांबर काडापे यासारख्या विचारंतांनी प्रत्यक्षात अशा प्रकारच्या विवाहातून समाजासमोर आदर्श ठेवला. अशा विवाहाचे प्रमाण बरेच आहे परंतु काहींना अनेक गैरसमाजाने ग्रासले असल्यामुळे ते समोर येण्यास कचरतात. जे अशा प्रकारचे साहस करतात, सामाजिक ऐक्यासाठी आपल्या आयुष्याची बाजी लावतात अशा तरूण सुधारकांचे स्वागत व्हायला हवे. नुकतेच प्रा. ब्रम्हानंद मडावी व कल्पना पेंदोर ह्या आदिवासी अध्यापक तरूणांनी सामाजिक दायित्व स्विकारून दि. २०/८/९९ ला दोन्ही बाजूकडील नातेवाईक आणि आदिवासी नेते तथा विचारवंत डॉ. विनायक तुमराम यांच्या उपस्थितीत जाणीवपूर्वक विवाहबद्ध झाले हे मात्र प्रशंसनीय आहे. अशा कृतीची आज गरज आहे.

● ● ●



## चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी विवाह पद्धत

# परधानी विवाह आणि गीते

- सौ. कुसुम अलाम

कोणत्याही जातीधर्मातील पारंपारिक विवाह सोहळा मंन मोहून टाकणारा असतो. पाने, फुले या सोबतच मंगलवादन आणि नृत्य वातावरण धुंद करत असतात. नविन नाते संबंध निर्माण होत असताना ह्या साऱ्या वातावरणाला नवेपणाने वेडे केलेले असते. विवाहाचे गीत गात नववधूस जेव्हा नव्या कपड्या दागिन्यांनी सजविण्यात येते तेव्हा त्या नववधूस संसाराची स्वप्ने पडत नसावीत का ?

आदिवासींच्या जीवनात नृत्याला फारच मोल आहे. नृत्याशिवाय आदिवासींचे जीवन अपूर्ण वाटते. ज्या ठिकाणी नृत्य आहे तेथे संगीत आलेच. त्यासाठी खास ढोलाची व्यवस्था असते. लग्न प्रसंगात तर ढोलाशिवाय लग्न म्हणजे लग्नाला शोभाच नाही असे होते. हा विवाह सोहळा चंद्रपूर जिल्ह्यातील परधानांचा. विवाह म्हटले की, रितीरीवाज आलेच त्यासाठी सगे आणि सोयरे दोघांचीही फार गरज भासते. हे सगेसोयरे आधीपासूनच लग्न घरी येतात. एकमेकांना सहकार्य करतात. गावातील जातभाई नातेवाईक सारे एकत्र येत असल्याने हा सोहळा कुणा एकाच्या घरचा न राहता त्याला सामाजिक सोहळ्याचे स्वरूप प्राप्त होते. आदिवासी समाजात आजही 'एकमेका साहाय्य करू' पद्धती आहे. काही समाजविघातकी लोकांचा यास अपवाद असू शकतो.

परधानी विवाहातील धार्मिक कार्य व गायली जाणारी गीते पुढीलप्रमाणे -

**हळद लावणे :** विवाहापूर्वीच वधुवरांच्या अंगास हळद लावली जाते. त्यासाठी हळद कांडणे हा दंडोक असतो. भिजवून ठेवलेले हळकुंड वाटण्याचे काम वराच्या / वधुच्या भावजयीस करावे लागते. त्यावेळी गायले जाते ते गाणे असे -

**हळदाई कांडा गे भावजायी**
**हळदाई कांडा गे**
**सुतारं घडीला पाटा**
**सुतारानं घडीला .... रे रे ला रेरेला रेला**
**भंडारेला सीली गोटा**
**ओ भंडारेला सीली गोटा**
**रामटेकची हरदाई**
**हमारी दुल्हन चौक बैठी**
**बेगी हरदाई लाना .... रेला रेरेला**

हळद वाटल्यानंतर माऊली (मातामाय) ला प्रथम हळद चढवली जाते. नंतरच मुलीच्या अंगास लावली जाते. मुलगी / मुलगा लग्नप्रसंगी जे वस्त्र परिधान करणार असतात त्या वस्त्राचे धागे सुद्धा प्रथम मातामायला आणि गोंडीकदेवाला चढविले जाते. प्रत्येक प्रसंग गाण्याशिवाय अपूर्ण असतो.

**घर का घाटा लाटे मारायी**
**घर का घाटा मातामायले**
**पहिली ढशी माता मायले ... रैला रेला**

(मातामाय गावाबाहेर वेशी जवळ असते)

घरी परतल्यानंतर पाच सुवासिनी वधुच्या / वराच्या अंगास हळद लावतात आणि तेल चढवतात.

ते तेल एरंडीचे असते विड्याच्या पानाने ते चढवायचे असते तेव्हा स्त्रिया गातात -

**तीरिल्या तीर बहिणी नांगलेले पाना**
**नवरीच्या मायाबहिणी तेल चढवायाना**
**........ रेलाँ.**

लगेच आंघोळ घातली जाते. वधूच्या / वराच्या डोक्यावर लोखंडी सराटा धरून त्या सराट्यात वडे पुऱ्या खोचलेल्या असतात. त्यावरून हलकेच पाण्याची धार सोडतात आणि गातात -

**काहायाचा पाणी पडे**
**काहायाचा पाणी वो काहायाचा**
**लोखंडाचा पाणी पडे**
**सोनियाचा पाणी पडे**
**मोतीयाचा पाणी पडे**
**सोन्यावानी दिसे वो लाडा**
**सोन्यावानी दिसे वो ... रेला रेला रेंरेला**

**घडी चढवणे :** आंघोळीनंतर ओल्या कपड्यांवरच घडी चढवणे हा कार्यक्रम होतो. लग्नप्रसंगी जे कपडे वधू / वरांस घालावयाचे असतात त्या कपड्याची घडी खाद्यांवर ठेवून ती घडी चढवणारा आपल्या खांद्यावर घेतो. वधू / वरास अक्षता लावल्या जातात आणि परत ती कापडाची घडी, वधुची साडी तिच्याच खांद्यावर ठेवली जाते. हा प्रसंग फारच हृदयद्रावक असा असतो. बहुतेक वेळा हे वधुच्या बाबतीत घडते. कारण लग्नप्रसंगी मुलगी जे वस्त्र परिधान करते त्यावेळी ती आता आपल्या घरी जाणार म्हणून भावनांचा कल्लोळ उडतो. गाणे सुरूच असते -

**घडी ते कोसर घडी**
**चिमटीने लावे लाडा साडी**
**घडी चढवायाना वो चढवायला**
**नवरीच्या मायाबहिणी घडी चढवा या नर**

**रेला रेला रे रे ला**
**बाबा इंदर घडी जो लाडा**
**बाबा इंदर घडी जो**
**मामा इंदर घडी जो लाडा**
**मामा इंदर घडी जो**

आणि जेवढ्यानी घडी चढवली असते तेवढ्या सर्वांच्या नात्यांचा उल्लेख गाण्यात होतो.

**चौक लिहिणे :** विवाह प्रसंगी वधू / वराच्या मामाला फार महत्व असते. मामाच वधूची ओंजळ धरतो. घडी चढवून झाल्यानंतर वधू ते कपडे परिधान केल्यानंतर तिला बसण्यासाठी खास व्यवस्था केली जाते. खऱ्या अर्थाने तिला लक्ष्मीचं रूप येते. मामा पिठाची रांगोळी काढतो. गुलाल, कुंकू, हळद इत्यादी त्यात भरतो आणि त्यावर एक नविन बिना खिळ्याचा पाट ठेवला जातो मग वधू त्यावर बसते. मामा चौक लिहिताना स्त्रिया गाणे गातात -

**अच्छा चौक लिखोगा मामा**
**अच्छा चौक लिखगा**
**हलदी ने चौक आया**
**गुलाल ने चौक आया**
**कुकवाने चौक आया गा ... रेला रेला**

**अईग :** अईग म्हणजे मातीचे मडके. लहान मोठे त्यावर रंगरंगोटी केलेली असते. ते मडके सोयरे मंडळींनी मिळून आणावयाचे. ते आणताना गायीले जाणारे गीत -

**कुंभारनी बाई माझे कुंभार लोक गेला**
**माती खंदू गेला बाई माती खंदू गेला**
**आढणयेली माती बाई चिकवली राती**
**हा अईग जाते बाई कोणाच्या येती**

**मांडव सुतवणे :** अईग आणल्यावर मांडव सुतवणे होते. मांडव सोयरे मंडळी, जोडीने सुतवतात. मांडवा भोवताली प्रत्येक डेरी (लाकडाचे खांब) यास सूत गुंडाळले जाते. त्यावेळी गातात -

**जागो तो जागो बहता**
**मेरा मंडप जागो वो**
**तेरा मंडप जाग तू**
**मुझे देशील काय ?**
**हातातली येर मोडीन**
**तुले नथनी घडीन वो**
**सागाच्या डेरी भैय्या**
**चंदनाचे वासे मा**
**मै तेरा मंडप जागू**
**तेरा मंडप साजे .... रेला रेला**

लग्न लावण्यापूर्वी देवळात जातात तेव्हा पुढील गाणे गायले जाते -

**दुलारी दुलारी मेरी अच्छी दुलारी**
**नाकातली नथनी शोभे**
**शिरीचा बारशिंग शोभे**
**बाबा गा बाबा/बेटी के भेट तुने लेना**
**बेटी चालली पराया देसा**
**रंगीत महाल सुना बाबा गा बाबा**
**तुने बेटी हारा गा**
**मैने नही हारा वो बेटी**
**बडे भैय्या ने हारा .... रेरेला रेला रे रे ला**

विरहाने विव्हळ झालेला पिता मी स्वत: मुलीचं लग्न जोडलं नाही तर मोठ्या भावाने ते जोडले आहे. म्हणून मोठ्या भावावर दोषारोप करतात. आज ना उद्या मुलगी परक्या घरी जाणार माहित असूनही आपल्यापासून दूर करताना अंत:करणात किती घालमेल होते, तो किती शोक विव्हळ होतो हे या गीतामधून स्पष्ट दिसते.

**पिक पाजणे :** या कार्यक्रमात मातृप्रेमाची महती पटते.

**लहानाची मोठी केलो माझ्या बाईले**
**लहानाची मोठी केलो**
**नवसूत्री पन्हा पाजलो माझ्या बाईले**
**लहान मोठी केलो ... रे ला**

वर कमरेला कट्यार खोचून मंडपात येण्यास निघतो तेव्हा त्या रूबाबदार वरास म्हणतात -

**घोड्यावर बैसला सुंदर दिसला**
**हा बाळ कोणाचा**
**पायी जोडा मुखी विडा**
**कोठ्या राजोबाका बेटा**

वधुची ओटी तिचा भाऊ भरतो आणि भावाची बहिण, असा रिवाज आहे. हा शिग भरणे कार्यक्रम असतो. त्यावेळी म्हणतात -

**बहिण शिग तू भर गा बंधवा**
**बहिण शिग... रेला**
**बडे भैय्या ने शिगो रे बहना**
**बडे भैय्या ने शिगो**
**तीळ तांदूळ मोज माझ्या जवाना**
**काहाचा मोज गा**
**गव्हाचा मोज गा .... रेला**

लग्न लागताना वर, वधू एकमेकांच्या डोक्यावर तांदूळ भरलेल्या मुठी ठेवतात आणि मंगलाष्टके होऊन ढोलाच्या गजरात विवाह सोहळा होतो. पण कार्यक्रम सुरूच असतात.

**ढेंडा :** लग्नानंतर ढेंडा होतो यात वर वधू हातात गुलाल घेवून बोहल्याभोवती फिरवतात.

**डेरी सोडणे :** मांडवावरून वरवधूच्या अंगावर पाणी टाकले जाते, खाली पाणी पडून चिखल होतो. त्यात सगेसोयरे एकमेकांना लोळवतात. हा एक आनंदाचा कार्यक्रम असतो. इथे अश्लिलता किंवा द्वेष यास मुळीच थारा नसतो. युवक युवती सुद्धा सांस्कृतिक पथ्ये पाळून यात सहर्ष सहभागी होतात. यात एकमेकांना हळद चारणे, गुलाल लावणे इत्यादी प्रकार चालतात. या कार्यक्रमास चिखलरोंडी सुद्धा म्हणतात. ढोल वाजतच असतो, नाचगाणे सुरूच असते. यावेळी झुलतेसुद्धा म्हटले जातात.

झुल्या :

१) **थाली त थाली दाद गा पितळेची झाली**
**कोण्या रस्त्यानं गेली माझी साली गा दादा**
**अन कालपासून भेट नाही झाली.**

२) **भरती का गाडा लगाऊ टेकुनी**
**तेरी चढती जवानी नजर हेकनी**


३) **छोटी मोटी गुडीया पचिन पान खाये**
**सडे चुने के लिए ढिमर घर जाये**

४) **आंगामंदी व तंग चोळी शिव चिटाचे झगे**
**तुझ्या गालावर आहेत दोन फुगे साली माझे**
....

आंघोळी होतात. त्यानंतर धार्मिक विधी "**सत्या पुजणे**" होतो या कार्यक्रमास फार महत्व आहे. सगे सोयरे संबंध यात सुदृढ होण्यास मदत होते. सहकार्याची भावना बळावते. आदिवासी मध्ये देव असतात चार, पाच, सहा, सात आणि बारा, जर सहा देववाल्यांचा मुलगा नवरदेव असेल त्याच्या घरची पुजा त्या नवरदेव मुलाच्या वडलांचा सोयरा तोच करेल. सहा मुठी तांदुळ शेणाने सारवलेल्या जागेवर ठेवायचे त्यावर गुलाल, हळद, कुंकू वाहायचे घरी जे वडे, पुऱ्या आणि नैवेद्य शिजवले असेल ते नैवद्य म्हणून ठेवायचे. ही पुजा जोडी बांधून करावी लागते. ही मोठ्या देवाची पुजा होय. या पुजेला दारू पिणे गैर नसते. नववधूस तिच्या सासूने ही पुजा आटोपल्यावर घर दाखवणे क्रमप्राप्त असते. घराची माहिती देणे, काम सांगणे, शेण, पाणी टाकणे, स्वयंपाक घराची ओळख इ. इथून तिच्या संसाराला सुरूवात होते.

परधान ही जमात गोंडाचीच एक उपशाखा असून दोघांचेही रितीरिवाज जवळपास सारखेच असतात पण गोंड राजे होऊन गेल्याने स्वत:ला श्रेष्ठ मानतात. परधानांच्या बऱ्याच गीतांमधून स्त्रीला किती महत्व आहे हे कळून येते. सहजीवनाची गुरूकिल्ली आदिवासी संस्कृतीत दडलेली आहे.

● ● ●



# राजा पानठा गाडा ठाकूर : आदिवासींचे परिवर्तनवादी समाज सेवक

- वीरसिंग पाडवी

नंदूरबार आणि धुळे जिल्ह्यात सातपुडा पर्वतीय भागात मोठ्या संख्येने आदिवासी लोक राहतात. त्यांची संस्कृती परंपरा रूढी रिवाज आगळी वेगळी असून त्यांचे देवी देवता आणि थोर वीर महापुरूषांच्या गोष्टी, इतिहास देखील आगळा वेगळा आहे. तो आदिवासींच्या लोककथा, कहाण्या यातून मिळतो. ह्या सर्व कथा कहाण्या मौखिक असून आदिवासी समाजातील अनेक जुने जाणकार म्हातारे वृद्ध व्यक्ती माहिती सांगत असतात. तसेच सण, उत्सव, तिव्हाराच्या वेळी पूजाविधी करणारे बोडवे, मोडवी, पुजारी इत्यादी देखील पूजा करताना आणि कहाण्या सांगताना हमखास उल्लेख राजा पानठा गांडा ठाकूर ह्या नावाचा नेहमी करत असतात. त्यांच्या कार्याचा, गुणाचा कहाणी कथेतून गुणगान केलेला आढळतो. तेव्हा वेगळा विचार केल्यास राजा पानठा गांडा ठाकूर जुन्या काळातील सुधारणावादी व परिर्वतन वादी व्यक्ती होत्या आणि आदिवासीतील समाज सेवक असावेत असे लक्षात येते.

राजा पानठाच्या वडिलाचे नाव तारहामाल व आईचे नाव उमरावाणू आणि राजा पानठाचा लंगोटी मित्र गांडा ठाकूर किंवा (जिन्या देव) असून पुढे मोठे झाल्यावर ते दोघे एकमेकाचे साले पाहुणे होऊन नाते संबंधाने जोडले गेलेले आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या राज्य कारभारात एकमेकांचे सहकारी आणि सल्लागार देखील होते आणि एकमेकांच्या सल्ल्याने आणि सहकार्याने राज्य कारभार चालवत. राजा पानठाचे दाब हे, तर गाडा ठाकूरचे बीड हे राज्य होते. दोघांचे मिळून दाबबीड हे संयुक्त राज्य होते हेच हेलो दाब म्हणून देखील ओळखले जाते. राज्य कारभार संयुक्तपणे चाले त्यामुळेच त्याच्या नावाला देखील जोड नावानेच ओळखले गेलेले आहे. राजा पानठा गाडा ठाकूर म्हणून आणि त्याच नावाने आजही ओळखले जाते.

ते दोघे नेहमी आपल्या राज्यात वेश पालटून काळ्या व पांढऱ्या घोड्यावर बसून हिंडत असत आणि आपल्या राज्यात काय चालू आहे, प्रजा काय करते आहे ते पाहत असत. दुसऱ्या प्रदेशात गेल्यावर तिकडील नविन धान्य आणून आपल्या राज्यात लोकांना पेरायला लावत असत त्यासाठी बिजूरी मेलो ह्या ठिकाणी रोपवाटिके सारखा प्रयोग करून लोकांना बी पुरवत असत व शेती करायला लावत.

एकदा फेरफटका मारायला गेले असता त्यांना एके ठिकाणी एक आळशी माणूस उंबराच्या झाडाखाली झोपलेला आढळला. (त्याला आदिवासी भाषेत आलह्यो डोडो असे म्हणतात तो दिसला) त्यासंबधी माहिती राजा पानठा, गाडा ठाकूरला मिळाली. तेव्हा त्यांनी सुरवातीला त्या आळशी माणसाला म्हणजे आलह्या डोडोला समजवण्याचे प्रयत्न केले पण निष्फळ झाले. तेव्हा त्याला शेजारच्या जंगलात नेऊन जागा दाखवली. ही नऊ होडा नऊ डाबरीची जागा आहे म्हणजे नऊ टेकड्यामधील नऊ खोऱ्याची कसदार जमीन आहे, या जागेची साफसफाई करून शेती कर. त्यासाठी अन्न धान्याचे बी दिले व धमकावून सांगितले. आम्ही परत येतो तो पावेतो येथे शेती पिकवलेली दिसली पाहिजे.

माणसाने आळशी राहु नये काबाड कष्ट करून कमवून खाल्ले पाहिजे असे सांगून काम सोपवून उपदेश देऊन पुढच्या प्रवासाला दोघे निघून गेले.

पुढच्या प्रवासात त्यांना एक गाव लागले. त्या गावी गाव दिवाळीचा उत्सव चालला होता. तेव्हा आजुबाजूच्या शेजारच्या गावातून देखील सार्वजनिक उत्सव असल्याने लोक चालले होते. परगावला दिलेल्या मुली माहेरी गाव दिवाळीच्या उत्सवाला आलेल्या होत्या. गावात मोठ्या आनंदाचे वातावरण पसरले होते. तेव्हा राजा पानठा गाडा ठाकूर देखील गावकऱ्यांच्या आग्रहाने उत्सवात भाग घेतला. रात्री करमणुकीचा कार्यक्रम झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी पूजा विधीच्या कार्यक्रमात दोघे हजर राहिले. त्या ठिकाणी काही लोक कोंबडीची लहान पिल्ले घुंगरू संबोधून पायाला बांधून नाचत होते. तर दुसरीकडे देवाची पूजा, पेचरा पूजारा म्हणजे बुलबुल नावाचा पक्षी पूजा करत होता आणि टूडो मोडवी नावाचा पक्षी म्हणजे (घुबड) पूजा बरोबर होते की नाही पाहात होता, निरीक्षण करत होता. अगदी लहान पक्षी लिल्या हेवऱ्या सर्वांची सोपवलेली कामे करत होता सेवकाची भूमिका बजावत होता.

गावात रोगराई येऊ नये, वाघ व साप जंगलात काम करताना त्रास देऊ नये, गुराढोरांना मारू नये, अन्न-धान्य चांगले पिकावे, गावाच्या शिवारात कोणतेही अनुचित प्रकार घडू नये, चोरी होऊ नये म्हणून अशाप्रकारे आराधना करण्यात येत होती. एका म्हाताऱ्या माणसाला बांधून ठेवण्यात आले होते. त्याचा बळी देण्याची तयारी चालली होती तेव्हा घडणारा प्रकार राजा पानठा गाडा ठाकूर यांच्या लक्षात आला. तेव्हा त्या म्हाताऱ्याला सोडून देऊन सर्वांना रोकून समजावले की आपण पण माणसे आहोत हा पण माणूसच आहे तेव्हा नर बळी देणे योग्य नाही. म्हणून नर बळी देण्याच्या प्रथेला गाव दिवाळीच्या उत्सवाच्या वेळी बंदी घातली. अशा प्रकारे राजा पानठा गाडा ठाकूर ह्यांनी अनादी काळी नर बळी प्रथेला बंदी घातली असून त्यामुळे त्यांना आजही आदिवासी संस्कृती परंपरेत फार मोठे स्थान आहे.

तसेच ते दोघें राज्य कारभारात देखील प्रविण होते. ते कोणताही निर्णय लोकशाही पद्धतीनेच घ्यायचे. त्यासाठी त्यांनी एक बेहड्याचे भले मोठे झाड निवडून त्या झाडाखाली मोल होला भरवायचे दरबार भरवायचे, त्या झाडाच्या एका फांदीला होलाचे पारडे (न्यायाचे प्रतिक म्हणून तराजू सारखे बांबूपासून बनवलेला तराजू) अडकवलेले असायचे सर्व प्रजेसमोर लोकांच्या निर्णयाने न्याय घ्यायचे. असे होते राजा पानठा गाडा ठाकूर.

ह्या व्यक्ती कोणत्या काळात होऊन गेल्या हे आज सांगणे कठीण आहे तो एक संशोधनाचा विषय बनला आहे. तरी देखील काही कहाण्यातील घटना लक्षात घेता असे वाटते की ज्या अर्थी लोक कोंबड्यांची पिल्ले घुंगरू समजून पायाला बांधून नाचत होती. त्या अर्थी त्याकाळी धातूचा शोध लागलेला नसावा, घुंगरू नसावेत. म्हणून ती माणसे कोंबडीची पिल्ले पायाला बांधून नाचत होती आपली हौस पूर्ण करत होती असे लक्षात येते. आणि धातू युगाच्या आधीच्या युगात ही माणसे होऊन गेली असावीत असे वाटते. काही जरी असले तरी जुन्या काळातील ही मंडळी परिवर्तनवादी आणि आदिवासीतील समाजसेवक होती म्हणून आजही आदिवासी बांधव त्यांना देव म्हणून मानतात.

● ● ●

# आसाममधील आदिवासी : परिस्थितीजन्य पृथःकरण

- रा. वि. भुस्कुटे

छोटा - नागपूर पठारावरून स्थलांतरीत होऊन आसाममध्ये वस्ती करून राहिलेल्या आसामातील या आदिवासी जमाती आहेत. १८३१ नंतर ब्रिटिशांनी चहामळ्यातून काम करण्यासाठी मध्य भारतातील आदिवासींना कंत्राटी मजूर म्हणून कराराने आणले.

आसाममधील आदिवासींची लोकसंख्या ४० लाख आहे. आणि एकूण लोकसंख्येच्या २० टक्के असे त्यांचे प्रमाण आहे. चहामळ्यांच्या प्रदेशात व अवती भोवती हे सर्व वास्तव करून आहेत. आसामातील सर्वाधिक मागासलेला आणि नागवला गेलेला हा समाज आहे. .

**ऐतिहासिक पार्श्वभूमी -**

१८३१ मध्ये सुमारे १७० वर्षांपूर्वी भारतात राज्य करणाऱ्या ब्रिटिश सरकारला खात्री पटली की उत्तर पूर्व. भारतातील आसामात मोठ्या प्रमाणात नैसर्गिकरित्या सर्वत्र चहा उगवतो. तेव्हा कायदेशीर ठरणाऱ्या चहाच्या उत्पादनासाठी चहाचे मळे निर्माण करायचे त्यांनी ठरविले. चहा मळ्यात काम करायला स्थानिक लोक नाखूष होते. चहा मळ्यातील श्रमप्रधान कामांसाठी आसाम बाहेरील प्रदेशातून मजुरांची आयात करणे त्यामुळे त्यांना भाग पडले. आवश्यक मजुरांची भरती करण्यासाठी मध्य भारताची निवड त्यावेळी योग्य ठरली. मध्य भारतात ब्रिटिशांनी जमीन विषयक धोरणाचा अवलंब केला त्यामुळे तेथील आदिवासींकडील जमीन फार मोठ्या प्रमाणावर हस्तांतरीत झाली होती. आणि ते पुरते भिकेला लागले होते.

तेव्हा ब्रिटिशांनी १८३१ नंतर आसामातील चहा मळ्यात दुष्काळपिडीत मध्य भारतातील भिकेला लागलेले आदिवासी भरती करून आणले. १८३१ मध्ये भरती केलेली पहिली तुकडी वाटेतच रोगराईमुळे मृत्युमुखी पडली. त्यातला एकहीजण ठरलेल्या कामाचे ठिकाणी पोहोचू शकला नाही. तरीही आसामातील चहा मळ्यांत राबविण्यासाठी मध्य भारतातील बिहार, ओरिसा आणि मध्य प्रदेशातील आदिवासींची भुलथापा देऊन भरती करून त्यांना स्थलांतरीत करणे चालूच राहिले. त्याकाळी आसाम हा वेगवेगळ्या रोगांनी बुजबुजलेला आणि रानटी श्वापदांनी व्यापलेला विषुववृत्तीय दाट जंगलाचा प्रदेश होता. जे आदिवासी कामाचे ठिकाणी चहाच्या मळ्यात पोहोचले त्यांना लवकरच समजून चुकले की, आपण आगीतून उठून फुफाट्यात येऊन पडलो आहोत. पराकोटीची पिळवणूक, दडपशाही, दारिद्र्य आणि घोर निराशा यामुळे त्यांचे जीवन पुर्वायुष्याच्या तुलनेत अधिकच दु:खी आणि असह्य झाले.

चहामळ्यात होत असलेल्या मजुरांच्या बेसुमार स्थलांतरणावर निर्बंध घालण्यासाठी व मजुरांच्या हितरक्षणासाठी १८६३ ला प्रथम आणि नंतर १९३२ मध्ये ब्रिटिश सरकारनी दोन कायदे केले. हे कायदे केल्यानंतरही आसामातील चहा मळ्यात होणारे

मजुरांचे स्थलांतरण स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही १९६० पर्यंत अव्याहतपणे चालूच राहिले. अद्यापही चहा मळ्यातून राबणारे मजूर संपूर्णतया आदिवासी समाजातीलच आहेत. गेल्या शतकाभरात चहा मळ्यातून जे वाढीव मजूर कामावरून कमी करण्यात आले ते सर्व, तसेच व्यवस्थापनाकडून केली जाणारी पिळवणूक व दडपशाही असह्य झाल्याने जे मजूर चहा मळ्यातून पळून आले ते चहा मळ्यांच्या हद्दीबाहेरच सभोवताली स्थायिक झाले. ज्या ठिकाणी ते स्थायिक झाले त्यांनाच आता बस्ती (गांव) म्हणून संबोधण्यात येते. चहा मळ्यात लोकसंख्या वाढल्यामुळे तेथील वाढीव मजुरही या बस्तीमधून स्थायिक होण्याची प्रक्रिया लहान प्रमाणात का होईना अजूनही सुरू आहे.

चहा मळ्याबाहेर कोठेही आज आदिवासी रहात असले तरी सर्वांचे मूळ शोधले तर ते चहा मळ्यातच आपल्याला सापडते. यामुळे आसाममधील सर्वच आदिवासींना ''सध्याचे किंवा पूर्वाश्रमीचे चहा मळ्यातील आदिवासी'' (TEA AND EX-TEA TRIBALS) म्हणून ओळखण्यात येते.

### सामजिक सांस्कृतिक स्थिती

मूळ स्थानापासून उखडल्या गेलेल्या स्थलांतरीत झालेल्या समाज समुहांप्रमाणेच आसाममधील आदिवासींची सामाजिक आणि सांस्कृतिक फरफट झालेली आहे. त्यांच्याच देशात ते निर्वासित झाले आहेत. देशातील अन्य भूभागातील आदिवासींना ज्याप्रमाणे स्वत:ची स्वतंत्र ओळख आणि अस्तित्व आहे तसे त्यांना राहिलेले नाही. भारत सरकारच्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये त्यांना समाविष्ट केलेले नाही. अर्थातच त्यामुळे आसामच्या आणि भारत सरकारच्या जनगणनेमध्ये त्यांची गणना सर्वसाधारण वर्गात केलेली आहे. त्यांना जरी आदिवासी म्हणून संबोधण्यात येत असले तरी त्यांना कायदेशीररित्या अनुसूचित जमात म्हणून मान्यता दिलेली नाही. त्यांचा सर्वसाधारण वर्गातच समावेश केलेला आहे. परिणामी आदिवासी म्हणून मिळणाऱ्या कोणत्याही सोयी सवलती, अनुदाने, शैक्षणिक सुविधा, आणि राखीव जागा वगैरेंचा फायदा त्यांना मिळू शकत नाही. विशेष म्हणजे ते ज्या राज्यातून स्थलांतरीत झाले तेथे त्यांच्या नातेवाईकांना आदिवासी म्हणून मिळणाऱ्या सोयीसवलती सुविधा अनुदाने वगैरेपासून आसाममतील हे स्थलांतरीत आदिवासी वंचित झालेले आहेत. आदिवासींचे समाज समांतर स्थरात विभागलेले असतात. जात आणि वर्गभेदापासून साधाणत: ते मुक्त असतात. त्यांच्यामध्ये समानतेची भावना प्रबळ असते. आसाममधील बाहुल्यवादी समाजातील त्यांच्या वास्तव्यामुळे हळूहळू जातीयतेची मानसिकता आणि अस्पृश्यतेची भावना मूळ धरू लागली आहे. आसाममधील सरळ उभ्या सामाजिक शिडीतील अगदी तळातील थरामध्ये ''कुली'' म्हणून ओळखला जाणारा आदिवासी समाज स्वत:चा अंर्तभाव झाला असल्याचे अनुभवत आहे. आसाममधील मुळच्या आदिवासीपेक्षाही त्यांचा सामाजिक दर्जा खालचा आहे. पार चिरडून टाकलेले, सर्वहारा झालेले, समाजातील शारीरिक श्रमांची जबाबदारी प्रामुख्याने पार पडणारे हे आदिवासी म्हणजे आधुनिक आसामधील चक्क भूदास, वेठबिगार आणि गुलाम आहेत.

## आर्थिक स्थिती

जगातील एकूण चहा उत्पादनापैकी अंदाजे २० टक्के चहाचे उत्पादन आसाममध्ये होते. अतिशय फायदेशीर असलेल्या चहा उद्योगातील श्रमशक्तीचा मूलाधार आदिवासी आहेत. पण असे असले तरी मागासलेपणा आणि अति दारिद्र्याने त्यांचे जीवन ग्रासलेले आहे. आसाममध्ये सर्वात कमी मजुरी, अमाप फायदा मिळविणाऱ्या चहा उद्योगातील मजुरांना दिली जाते. तर लाचारी जी-हुजरेगिरी आणि दास्यत्व ही तेथील कामाच्या स्थितीची वैशिष्ट्ये मानावी लागतील. चहाच्या बागांबाहेरील आदिवासींची स्थिती तर भलतीच दयनीय आहे. पिळवणुक करायला सवकलेल्या जमीनदारांच्या सिंचीत जमीनीत ते गुजराण करतात. मिळणारी शेतमजूरी अत्यल्प तर भूखंडखातून मिळणारे उत्पन्न कुटुंब पोषणास अगदीच अपुरे असते. साहजिकच निगरगट्ट निचाड्या सावकारांचे ते भक्ष्य बनतात. आणि कधीही न फिटणाऱ्या कर्जाच्या जाळ्यात त्यांना ते कायमचे जेरबंद करून ठेवतात. दारिद्र्यरेषेखालचे जीवन ते जगतात आणि निराश्रीत म्हणून धरणीवर देह ठेवतात.

## साक्षरता

आसामातील आदिवासींमधील साक्षरतेचे प्रमाण अवघे ५ टक्के आहे. शाळा प्रवेशाला पात्र असलेल्या वयोगटातील अवघी ३० टक्के मुलेच शाळेत जातात. या ३० टक्क्यांपैकी फक्त २० टक्के मुले हायस्कूल पर्यंत मजल मारतात. तर ८० टक्के मुले शाळेतून गळतात. अनुसूचित जमातीचा दर्जा न दिल्यामुळे देशातील आदिवासींना उच्च शिक्षणासहीत सर्व शैक्षणिक सुविधांना हे आदिवासी पारखे झाले आहेत. शिक्षण संस्थांमधील प्रवेशासाठी, नोकऱ्यांसाठी सर्वसाधारण समाजाच्या जोडीनेच त्यांना चढाओढीमध्ये उतरावे लागत आहे. खाजगी शाळांतून प्रवेश मिळवून शिक्षण घेणे त्यांना परवडत नाही. सरकार संचालित शाळांचा निकृष्ट शैक्षणिक दर्जा आणि या जोडीला सर्वसाधारण सामाजात समाविष्ट झाल्यावर निर्माण होणारी आदिवासींची प्रतिमा याचा एकत्रित परिणाम साहजिकच शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढण्यावर होतो. रोजगाराची हमी नसणे, आणि अन् उल्लंखनीय अर्थिक अडचणीमुळे शिक्षीत आणि कुशल आदिवासींच्या संख्या नगण्य असते.

चहामळ्यातील आदिवासींच्या शाळा हा केवळ देखावा आहे. बहुधा एकाच खोलीतील चार इयत्तांसाठी एकच शिक्षक असतो. अशा हीन दर्जाच्या शैक्षणिक सुविधांमुळे चहा बागांच्या व्यवस्थापनाला त्यांच्या बागेत श्रमणाऱ्या मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची खरीखुरी कळकळ नसल्याने आदिवासींची ही मुले चौथी इयत्ता पास होऊन माध्यमिक शाळेपर्यंत पोहोचत नाहीत. परिणामी फारच थोडी मुले माध्यमिक शिक्षण कसेबसे पूर्ण करू शकतात आणि त्यापैकी अपवादात्मक मुलेच फक्त उच्च शिक्षण पूर्ण करतात. आणि चहामळ्याबाहेरील नोकऱ्यासाठी होणाऱ्या चढाओढीत उतरतात. आदिवासी तरूणांच्या या शैक्षणिक दुरावस्थेमुळे धूर्त आणि चहा मळेवाल्यांचा मात्र चांगल्याच फायदा होतो. भरभराटलेल्या अमाप

नफा देणाऱ्या त्यांच्या चहा मळ्यासाठी स्वस्त मजूर मोठ्या संख्येनी त्यांना प्राप्त होतात. टाटाचे चहामळे मात्र याला अपवाद आहेत. एवढेच नाही तर आवश्यक ती शैक्षणिक पात्रता असल्यास कुशल, तांत्रिक आणि प्रशासकीय पदांवर आदिवासींना नेमण्याचे टाटांचे धोरण आहे.

### आरोग्य

आदिवासी समाजाला भंडावून सोडणाऱ्या आजारांची प्रमुख कारणे कमालीची अस्वच्छता, आणि निकृष्ट अपुरा आहार (कुपोषण) ही आहेत. बाळंतपणापूर्वीच्या गर्भारपणात मातांना दिला जाणारा निकृष्ट सत्वहीन आहार आणि बाळंतपणात होणारी हेळसांड यामुळे आदिवासी मुलांच्या कित्येक पिढ्या शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या दुर्बल निपजल्या आहेत. मुलांमध्ये पोलिओ अजूनही मोठ्या प्रमाणावर आहे. मलेरिया, हगवण, आणि गॅस्ट्रोच्या साथी दरवर्षी उद्‌भवतात. आदिवासींमध्ये मृत्यूदर खूपच मोठा आहे. विशेष म्हणजे महिला आणि मुले दगावतात.


### राजकारणातील स्थान

माणूस म्हणून सन्मानाने राहाता येवे म्हणून स्वतःचे भवितव्य स्वतःच ठरविण्यात अद्यापपर्यंत तरी आसामातील आदिवासी असमर्थ ठरले आहेत. चहामळ्यातील सध्या आणि पूर्वीचे लक्षावधी आदिवासी ज्यांना भारत आणि आसाम सरकारने अनुसूचित जमात म्हणून कायदेशीर मान्यता दिलेली नाही. अशा लक्षावधी आदिवासींमध्ये पुरेशी राजकीय जागृती नाही. भक्कम संघटना नाही. त्यामुळे त्यांचे राजकीय अस्तित्व शुन्यवत आहे. त्यांचेकडे मतांची शक्तीशाली बँक असूनही त्याचा फायदा त्यांना अद्याप घेता आलेला नाही. ही कटू वस्तूस्थिती आहे. राज्यात होणाऱ्या राजकीय चळवळींच्या कडेकाठाला हे आदिवासी आतापर्यंत राहीलेले आहेत. त्यामुळे त्यांचा प्रभाव राजकारणावर आजपावेतो तरी पडू शकलेला नाही.

थोडक्यात आसाममधील आदिवासींच्या दैन्यावस्थेची, त्यांना भोगाव्या लागणाऱ्या अपार दु:खाची आणि माणुसकीची होळी करणाऱ्या अतीद्ररिद्रयाची कथा फार जुनी, पुराणी आहे. ऐतिहासिक साम्राज्यवादी शक्ती, बाहेरच्या तसेच आदिवासींना अजाणता स्वतःच निर्माण केलेल्या परिस्थितीने बहाल केलेली ही देणगी आहे. आदिवासींच्या सामाजिक आणि राजकीय व्यक्तीमत्वाचा परिपूर्ण विकास हाच या सर्व समस्यांवरील रामबाण उपाय आहे.

*(श्री. ऑस्कर परेरा, एस. जे. बालिपारा यांचा लेख ''सिच्युएशनल ॲनलिसीस ऑफ आदिवासीज् ऑफ आसाम'' चे भाषांतर)*

● ● ●



# गोंडी चळवळ : आदिवासी एकसंघतेला अडथळा

- सुनिल कुमरे

आदिवासी समस्यांचा वापर येथील प्रस्थापित व्यवस्थेने केला. त्यांच्या समस्या केवळ आम्हीच सोडवू शकतो असा वांझ आशावाद त्यांनी दिला. वेदना-समस्या आदिवासींच्या उपाय मात्र पांढरपेशांचे. त्यामुळे आदिवासींच्या समस्या सुटल्या तर नाहीच परंतु न सुटणारे नवीन प्रश्न निर्माण झाले. प्रस्थापितांविषयी आदिवासींच्या भावना तीव्र टोकाच्या आहेत हे सागंणे नाही. परंतु आज आपणास काही समस्यांवर विचार करावा लागणार आहे. परंतु आदिवासींमधील चळवळींचा चेहरा काही वेगळेच दर्शन घडविते.

आंध, कोलाम, भिल्ल, गोंड, थोटी, माडियांच्या वेगवेगळ्या चळवळी, ''आदिवासी महादेव कोळी मोर्चा'', परधान मेळावे, गोंडी धर्म सम्मेलन, गोंडवाना साहित्य सम्मेलन, ज्यांच्या मनात येईल त्यांनी साहित्य संम्मेलने घेवून आदिवासींच्या चळवळींचा चेहरा-मोहरा विद्रुप करून टाकला आहे. आपणच आपल्या समस्या जटील केल्या आहेत, आपणच आपल्या ऱ्हासास कारणीभूत आहोत असा समाजनायकांचा वैफल्यग्रस्त निष्कर्ष दिसतो. अशाच काही समस्यांपैकी एक म्हणजे आदिवासींना एकसंघ करण्यासाठी आदिवासींच्या उपजमातींमध्ये सोयरसंबंध निर्माण होणे.

मूलत: आदिवासी हा एक अनेक उपजमातींचा मिळून बनलेला एकसंघ मानवसमूह ! कोणतीही जातीय उतरंड नसलेला. पूर्वी ह्या सर्व मानवसमूहात रोटी-बेटी व्यवहार होत असे. सर्व समुदाय गुण्यागोविंदाने राहायचे. परंतु परकियांच्या आक्रमणाने त्यांच्या एकतेला सुरूंग लावला. हिंदू धर्मियांच्या जाचक वर्णव्यवस्थेने त्यांचे सुंदर रूप कुरूप करून टाकले हा संक्षिप्त इतिहास. परंतु प्रादेशिक भिन्नता वगळल्यास आजही आदिवासींच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक परंपरा सारख्याच ! मग ह्या सर्व जमातींचा पूर्वीचा सुंदर, सुस्वरूप चेहरा पूर्वीप्रमाणे का होवू नये ? आपल्या उज्वल, चांगल्या सांस्कृतिक मुल्यांशी एकरूप होऊन आदिवासी एकसंघ झाला पाहिजे असा हितावह मार्ग कुणाला पटणार नाही ?

अशा प्रकारचे अनेक प्रयत्न झाले आहेत. आदिवासींच्या हितचिंतक कार्यकर्त्यांनी असे प्रयत्न केले आणि सुरूच आहेत. परंतु आदिवासींमधील काही प्रतिगामी चळवळींना हे मान्य नाही. त्यापैकी गोंड जमातींच्या म्होरक्यांची गोंडी चळवळ ! गोंडी भाषा, गोंड साहित्य, गोंडी धर्म, गोंडवाना विद्यापीठ, गोंडवाना राज्य, गोंडवाना गणतंत्र पार्टी, गोंडवाना दर्शन, गोंडवाना संदेश अशी चौफेर गोंडाच्या हिताविषयी बोलणारी गोंडी चळवळ, संकुचित विचारधारेची गोंडी चळवळ ! वरील सर्व कार्यवृत्तांत पाहिला तर त्याचे आपण स्वागत करायला हवे. परंतु ह्या सर्व घडामोडी दिसायला वरवर क्रांतीच्या वाटत असल्या तरी त्याचे मूळ मात्र आदिवासी एकसंघतेच्या स्वप्नाला सुरूंग लावणारे आहे.

समाजाचा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक वारसा जोपासणे योग्य. परंतु आपल्याच सांस्कृतिक एकतेला सुरूंग लावणारी बुद्धीमत्ता, कार्यकुशलता फुसकी नव्हे का ? दि. १०, ११, नोव्हे. १९७९ भद्रावती येथे पहिले आदिवासी साहित्य संमेलन झाले. आदिवासी साहित्याची ओळख सर्वव्यापी झाली आहे. नागपूर,

मुंबई, रामनंदतीर्थ विद्यापीठाने त्यांची दखल घेतली. सहा आदिवासी साहित्य संमेलने झाली. तरीही दि. २४, २५ डिसें. १९८८ ला भद्रावती येथे पहिले अखिल गोंडवाना साहित्य संमेलन घेण्याचे प्रयोजन काय ? आदिवासी साहित्यात गोंडांचे वेगळे साहित्य संमेलन घेवून सवतासुभा निर्माण करणे मखलाशी नव्हे काय ?

दि.१९, २० डिसेंबर १९९८ च्या नवव्या अखिल गोंडी साहित्य संमेलनाच्या (नागपूर) अध्यक्षा महाराणी तेजश्री देवी भानुप्रतापसिंह पुर्रे म्हणाल्या, ''अनेक साहित्यिक आपआपल्या दृष्टिकोनातून साहित्याची रचना करतात त्याचप्रमाणे मी 'गोंडाची' प्रतिष्ठा परत मिळविण्याच्या उद्देशाने साहित्याची रचना करीत आहे. आपल्या अस्तित्वाकरीता गोंडी समाजाने आंदोलन चालवावे.'' केवळ गोंड आणि गोंडांचीच चळवळ म्हणजे गोंडी साहित्याची फलश्रुती समजायची काय ? ज्यांनी ही चळवळ उभारली ते स्वयंसिद्ध गोंडवाना साहित्य पुन:प्रवर्तकांचे किती साहित्य प्रकाशित झाले ? गोंडी साहित्याची भूमिका काय ? आणि कुणासाठी ? गोंडी साहित्यात परधान, भिल्ल, कोलाम, वारली, कातकरी, आंध, थोटी आणि इतर आदिवासी जमातींचे स्थान कोणते ? इतर आदिवासी जमातींच्या धार्मिक, सांस्कृतिक परंपरेविषयी गोंडी धर्म आचार्यांची भूमिका कोणती ? गोंडी साहित्यिकांच्या वाङ्:मयीन कार्याची दखल आदिवासी साहित्यात आदरपूर्वक घेतली गेली.

परंतु आजपर्यंत लिहिलेल्या गोंडी साहित्यात आदिवासी साहित्यिकांच्या वाङ्:मयीन कार्याची दखल गोंडी साहित्यिकांनी का घेतली नाही ? आदिवासी एकसंघ होईल याविषयी गोंडी साहित्यिकांची भूमिका कोणती? अर्थात ह्या सर्वांचे उत्तर नकारार्थी आहे.

गोंड जमातीची राजकीय कारकीर्द, उच्च कुळ, जातीय उच्च-नीच्च भेदभावाने टरारलेली मने, संख्याबळामुळे ते आपल्यातच मशगुल दिसतात. ''राजवंशीय असल्यामुळे राजगोंड हे स्वत:ला इतर गोंडापेक्षा उच्च व श्रेष्ठ समजतात हे सामजिक सत्य आहे. आजच्या वादळी व आधुनिक काळात ही उच्च-नीच्चतेची भावना गोंडाच्या आणि एकूणच आदिवासींच्या एकतेला सुरूंग लावल्याशिवाय राहणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे. आदिवासींच्या अभेद्य संघटनेसाठी जातीयभावना व द्वेष त्याज्य ठरवीले पाहिजे, हा क्रांतीविचार राजगोंडाच्या डोक्यात केव्हा प्रकटेल कोण जाणे ?'' (आदिवासी साहित्य : स्वरूप आणि समिक्षा डॉ. विनायक तुमराम)

गोंडांच्या चळवळी प्रतिगामी, पृथक आणि संकुचित विचारधारेच्या आहेत. त्यामुळेच आदिवासी एकसंघतेचे स्वप्न अधुरे आहे. येणारी पिढी त्यांच्या अक्षम्य चुकास माफ करणार नाही. गोंडाच्या चळवळीतील म्होरक्यांनी वेळीच जागृत झालले बरे ! अन्यथा त्यांच्या सभा-संमेलने, साहित्यासकट त्यांचेवर सामाजिक बहिष्कार टाकण्याची दुर्दैवी वेळ येईल. त्यासाठी गोंडी साहित्यिकांनी त्यांच्या लहान-मोठ्या प्रवाहासोबत आदिवासी साहित्य सागरात विलीन व्हावे म्हणजे आदिवासी एकसंघतेकडे वाटचाल होईल.



# गाडी जादू

- रायसिंग महाराज

बावनगड ह्या राजधानीत रायसिंग नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला चार मुले होती एक कायसिंग, शामसिंग, मानसिंग, वनसिंग, या चौघाचे लग्न झाले होते त्यांचा गंगाभारती राजगुरू होता. राजगुरूचा गावाबाहेर मठ होता. गुरू हा सात्वीक विचाराचा व खरोखरच ज्ञानी पुरूष होता. तो काशी निवासी होता. त्याला राजधानीतून मधुगिरी म्हणजेच दोन वेळचे जेवण राजाचे चार मुलांपैकी एकाने रोजनित्य नेमाने जात असे. बरीच वर्ष निघून गेल्यावर राजा म्हाताऱ्या अवस्थेत असता त्याचे राजवाड्यात नविन एक राजगुरू आला. तो सुद्धा काशी निवासीच होता. त्याने राजाच्या मुलांची भेट घेतली व पूर्वीच्या राजगुरू गंगाभारती बद्दल उलटसुलट सांगून आपली स्वत:ची प्रशंसना केली. मी तुमच्या गुरू पेक्षा १२ गाडी जादू शिकलो आहे. त्याच्याकडे फक्त १० गाडी जादू आहे. मी त्याच्या पेक्षा मोठा आहे. तरी आपण आपल्या वडिलांचे गुरू आहेत त्यांना काढून टाका व आपण तरूण, धाडसी राजकुमार आहात तर तुम्ही मला गुरू पदावर आरूढ करा व तुमच्या राज्याची भरभराट पहा. अलग भारती या नविन गुरूला त्यांनी गुरूपदावर बसवून जुना गुरू गंगाभारतीला हाकलून लावले. तो बिचारा त्याच्या मूळ गावी काशीला जाऊन राहिला.

काही वर्ष निघुन गेल्यावर या अलग भारती गुरूने जादूने वाघ तयार करून रानोमाळ वाघ लोकांना, गुरूंना त्रास देणे सुरू केले तेव्हा राज्यातील लोकांनी राजदरबारी येऊन वाघाची तक्रार नोंदणी राजाजवळ केली. ते ऐकून चार राजकुमार यांनी घोडेस्वार होऊन रानात वाघांच्या बंदोबस्तासाठी निघुन गेले. इकडे राजगुरुला मधुगिरी गेली नाही. दिवसा २-३ वाजता म्हाताऱ्या राजाला गुरूची आठवण झाली व त्यांनी आपल्या सूनांना विचारले की पोरींनो अलग भारतीला मधुगिरी गेली होती काय ? त्यावर सुनांनी नाही म्हणून उत्तर दिले. तेव्हा राजा रागाने म्हणाला एखादी पोरीने जाऊन मधुगिरी देऊन येणे. तो साधु चांगला नाही तो आपणास शाप देऊन टाकेल. हे ऐकून चौघा सुनांपैकी लहान सून पद्मावंती ही मधुगिरी घेऊन मठात गेली. तेव्हा अलग भारती मठाच्या बाहेर पायरीवर आसन लावून बसला होता त्याने त्या राज सुनेला मठात शिकेवर ती मधुगिरी ठेवण्यास सांगितले.

त्याप्रमाणे ती पद्मावती सून आत मठात शिकेवर मधुगिरी जाऊन ठेवणार तेवढ्यात अलग भारती जादू याने आपल्या मंत्र सामर्थ्याने तो मठच्या मठ उडवून आपल्या काशीला नेला. तेथे त्या सुनेने पण अलग भारतीला सांगितले अंगाला जर मला १ वर्षभर स्पर्श केला तर मी आत्महत्या करून मरेन. त्याने तिचे शब्द ऐकून म्हटले १ वर्ष काहीच हरकत नाही. तुला येथून कोण परत घेऊन जाणार ? माझ्याकडे १२ गाडी जादू आहे. जो कोणी तुला घेण्यास येईल त्याला मी येथेच जाळून टाकेन तु त्यांची अपेक्षा सोड मलाच नवरा समज मी तुझी सर्व इच्छा पूर्ण करेन. तिला जेवण्याचे सर्व सुविधा करून तो सकाळीच गावात जुव्वाबाजी खेळण्यास जात असे व २ वाजेला घरी जेवणाला येत असे. असा त्याचा नित्यक्रम चालू होता.

इकडे बावनगड राज्यांत वाघाच्या शिकारीस गेलेले चार राजकुमार त्या संध्याकाळी परत आले. राजाचा नियमाप्रमाणे त्यांच्या स्त्रिया त्या त्या राजकुमारांना आरती घेऊन आल्या. त्यात तिघांच्या स्त्रीया होत्या. एक लहान राजकुमाराची स्त्री कोठे आहे. तेव्हा तिची शोधाशोध केली असता ती दुपारी राजगुरूला मधुगिरी देण्यास गेली होती. ती आली किंवा नाही हे कोणालाच माहीत नव्हते. तेव्हा त्या राजकुमारांनी साधुच्या मठाकडे घोडे फिरविले तर तेथे मठच शिल्लक नाही हे पाहून ते चौघे राजकुमारांना भयंकर क्रोध आला व आपली चूक त्यांना कळून चुकली की पूर्वीचा वडीलांचा राजगुरू गंगाभारती हा किती सज्जन व आत्मज्ञानी व दिव्य पुरूष होता. त्याला आपण हाकलून चोराला घरात घेतले म्हणून ते घरी अन्न पाणी न घेता घोड्यांच्या खोगीराच्या पिशवीत तहानेचे लाडू घेऊन त्या एका राजकुमाराच्या स्त्रीच्या शोधात निघाले.

बरेच दूर काही योजने घोडेस्वार चालून गेले व दिवस संपला. किर्रऽऽ अशा अरण्यात रात्र अंधाराची असल्याने त्यांनी एका जुन्या विहीरी तळ्याजवळ घोडे थांबविले व ते तेथे मुखमार्जन करून आपल्या पिशवीतले भुक तहानेचे लाडू खाणार तोच वाघ व रिस हे दोघे नित्य नियमाप्रमाणे पाण्यावर आले ते घोडे व राजकुमार पाहून रिस त्याच्या भाषेत वाघोबाला म्हणाला आज फिरून दिवसभर दमलो तरी शिकार सापडली नाही. तर देवाने आता भरपूर शिकार पाठवून दिली. त्यावर वाघोबा म्हणाला मला अगोदर त्यांची विचारपूस करू दे. नंतर वाघोबाने त्या राजकुमारांना विचारले आपण कोन ? कुठे निघालात? त्यावर राजकुमारांनी सांगितले की तू जसा जंगलाचा राजा तसेच आम्ही नगरचे राजकुमार आमच्या एका स्त्रीला काशीच्या अलग भारती साधूने पळवून नेले आहे. तिच्या शोधार्थ आम्ही निघालो आहोत. रात्र अंधारी म्हणून मुक्काम पडता येथे पाण्याची विहीर दिसली म्हणून आम्ही थांबलो व सकाळी दिवस उजाडल्यावर जाणार. त्यावर वाघोबा याने सांगितले तुम्ही निर्धास्त झोपा आम्ही पहारा करू त्याचे हे प्रेम वाक्य ऐकून रिस फारच दु:खी झाला व वाघोबाला म्हणाला एवढी संधी मिळाली तरी तू उलट त्यांना पहारा करणार ? त्याच्यावर वाघोबाने सांगितले ते माझे भाऊबंद आहेत त्यांना कसे बरे मारता येईल ?

ते राजकुमार रात्रभर झोपी गेले व सकाळी वाघोबाचा निरोप घेऊन काशीच्या मार्गाला लागले. त्यांनी काशीला जाऊन चौकशी केली व तो साधुचा मठ पाहून ते मठाच्या पटांगणात जाऊन राजकुमारीला तिचे शब्द न ऐकल्याविना तिच्या पतीच्या घोड्यावर बसवून बावनगड नगरचा मार्ग धरला. घोडे जवळ जवळ बावनगडच्या सीमेवर येणार तेवढ्यात अलग भारती साधू जुव्वाबाजी खेळून घरी त्याच्या मठात आला व त्याने राजकुमारीला हाक मारली. पण त्याला होकार कोण देणार ? त्याला राग आला तो जोरजोरात ओरडू लागला व शेवटी त्याने इकडे तिकडे पाहिले तर तेथे घोड्यांचे पाऊल व त्याचे लीद त्याला दिसले व त्याने म्हटले अरे अरे हिला तर राजकुमार घेऊन गेला पण मी साधा नाही मी बारागाडी विद्या शिकलो आहे. ते सर्वजण जाणार कुठे पण ते त्याच्या सीमेपलीकडे जायला नको तरच माझी जादू काम करेल. लगेच तो ध्यान योगाला बसला व त्याने ध्यानमुद्रेने त्यांना पाहिले तर ते बावनगडला पोचणार तेवढ्यात या साधूने आपल्या १२ गाडी जादू सामर्थ्याने त्यांच्यावर मंत्र फेकला.

त्याबरोबर थोड्याच वेळात चौघे घोड्यांसह राजकुमार राजकुमारीला घेऊन परत त्याच ठिकाणी येऊन उभे राहिले व घोड्यांनी हिंगरण्याचा आवाज केला. हे पाहून अलग भारती साधू आनंदित होऊन जोरजोराने हसू लागला व परत क्रोधयुक्त होऊन शापवाणी बोलू लागला. जा तुम्ही चौघे राजकुमार शिळा होऊन पडा व चार वारू (घोडे) जगतात निळी होऊन फिरा !!

त्या शापवाणी प्रमाणेच राजकुमार शिळा (दगड) होऊन पडले व चार वारू निळ होऊन जंगलात (अरण्यात) निघून गेलेत. हे पाहून साधू हसत हसत त्या राजकुमारीला म्हणाला पाहिलेस राजकुमारी आता तुला येथून कोण घेऊन जाणार ? पाहिलेस माझी जादू ? इकडे बावनगड राजधानीत राजाराणी व तीन सुना होत्या. त्यापैकी मोठ्या सुनेला, ज्या दिवशी राजकुमार त्या राणीच्या शोदात निघाले होते त्याच दिवशी दिवस गेले होते व त्या गोष्टीला बऱ्याच वर्षाचा काळ लोटला गेला होता. इकडे त्या मोठ्या सुनेला मुलगा झाला होता तोच त्या राजधानीला दिपक होता म्हणून त्या बाळाला तिघे माता व आजोबा आजी फारच लाडकोड करीत त्याचे पालन करीत होते. दिसेमासे मोठा होत तो मुलगा नऊ दहा वर्षाचा झाला होता. तो गावातील मुलांबरोबर विटी दांडू कबडी खेळ खेळत असे पण तो कोणा मुलांना हारी जात नसे. म्हणून मुलांनी कंटाळून त्याला खेळू देऊ नये असा कट केला व तो राजकुमार असल्याने त्याला खेळात नाही म्हणायचे तरी कसे ? तर त्यांनी एक युक्तिवाद काढला ज्याला वडिल असतील त्यालाच आपल्या खेळामध्ये भाग घेता येईल.

एकाने प्रत्येकाला विचारले तुला वडिल आहेत का ? तेव्हा सर्वांचे उत्तर होय असे आले. नंतर राजकुमारला विचारले तेव्हा तो अडखळला व मी घरी आईला विचारून येतो असे सांगून राजकुमार घरी राजवाड्यात आला व आजोबासह सर्व आईंला विचारले की आपण मला तीन आया आहेत पण माझे वडिल कोठे आहेत व त्यांचे नाव काय आहे? आजपर्यंत मला वडिल दिसलेच नाहीत. त्याने हट्ट धरला तेव्हा तिघे राण्या रडू लागल्या तेव्हा त्या राजकुमार हरीसिंग याने हट्ट धरून रडण्याचे कारण वगैरे सर्व काही त्या आजा आजी व आई कडून विचारणा केली.

मग त्याला त्यांच्या काकूची व काका-चुलत्या वडिलांची संपूर्ण हकीगत कळली. मग त्याने त्यांच्या शोधार्थ जाण्याचा हट्ट धरला. त्या म्हाताऱ्या आजी आजोबांनी पुष्कळ समजाविण्याचा.प्रयत्न केला की तुझे वडील काका चुलते त्या भयंकर जादूगा साधूच्या नादी लागून आज बरीच १५-१६ वर्ष झाली. ते जिवंत असते तर त्यांचा आतापर्यंत निरोप आला असता. तू तर आम्हाला, राज्याला दिपक आहेस तू जाऊ नकोस. पण त्याने जाण्याचा निर्धार केला मग त्या त्याच्या तिघे आईंनी त्याला भुक तहानाचे लाडू वगैरे घोड्याच्या पिशवीत भरून त्याचा निरोप घेतला. त्याची घोडेस्वारी निघाली ते थेट त्याचे वडिल काका जेथे त्या जंगलात विहीरीजवळ रात्री मुक्कामाला थांबले होते तेथेच त्याला रात्र झाली व त्या ठिकाणी पाण्याची विहीर (तळे) पाहून व रात्र अंधाराची म्हणून तो तेथेच घोड्याला पाणी दाखवून त्याने सुद्धा आपली शिदोरी काढून भुक तहानेचे लाडू खाऊ लागला. खाऊन पाणी प्याला तोच तेथे त्याच वेळचे वाघोबा व रिस तेथे पाण्यावर आले. त्याला पाहून रिस वाघाला म्हणाला त्या वर्षी रात्री घोडेस्वार आपले म्हणून सोडून दिलेत आज एकटाच

मनुष्य घोड्यासह आला आहे. ती शिकार सोडू नको. त्यावर वाघाने म्हटले ज्या चार राजकुमार त्यांच्या एका स्त्रीच्या शोधार्थ गेले पण आज १५, १६ वर्ष लोटली पण ते परत फिरले नाहीत तर हा नक्कीच त्यांचाच मुलगा असावा व तो त्याच्या शोधासाठी निघालेला आहे. तर तो माझाच मुलगा समज. मग त्याला खाता येईल काय ? त्यावर रिस खिन्न झाला. बर त्याला विचार. मग त्या वाघाने विचारले अरे गृहस्था आपण कोण ? व कोठे जात आहे ? त्यावर राजकुमार हरीसिंग याने उत्तर दिले, मी राजकुमार मी माझ्या काकुच्या शोधासाठी माझे वडील व काका १५-१६ वर्षापूर्वी गेले आहेत पण आजतागयात त्यांचा निरोप किंवा पत्ता नाही म्हणून मी त्याच्या शोधार्थ निघालो आहे. तेव्हा वाघाने सांगितले तुझे वडील व काका असे चार घोडेस्वार १५, १६ वर्षापूर्वी इकडून गेलेत व याच ठिकाणी मुक्काम केला होता. त्याचे संरक्षण माझे भाऊबंद म्हणून मी केले होते व ते परत अद्याप फिरले नाहीत. तर तू त्यांचाच मुलगा म्हणून माझे कर्तव्य म्हणून तुझेपण मी रात्रभर सांभाळ करतो. तू निश्चित झोप घे व सकाळीच तुझ्या कामाला लाग.

त्याप्रमाणे रात्र गेली दिवस उजाडला मग तो राजकुमार हरीसिंग वाघोबा व रिस यांचा निरोप घेऊन काशी नगरीच्या मार्गाने निघाला. तो काशीला पोहचला व त्या ठिकाणी विचारपूर्वक पूर्वीच्या गुरू गंगाभारती याचा शोध घेऊन त्यांच्या आश्रमात गेला. गुरू गंगाभारतीला भेटून आपले आजोबा राजा बावनगडचा रायसिंग याचा मी नातू आहे व आजपर्यंत घडलेली संपूर्ण हकीगत त्याने त्या गुरू गंगाभारतीला सांगितली. त्यावर विचार करून गंगाभारतीने त्याला त्याच्याच आश्रमात ठेऊन घेतले व त्याला अलग भारतीच्या १२ गाडी जादूला तोडीसतोड जादूचे शिक्षण दिले व त्याचे संपूर्ण पाठांतर करून घेतले व सांगितले त्या अलग भारती गुरूचे मृत्यु सात समुद्र पलिकडे एक भयंकर असे अरण्य (जंगल) आहे. तेथे एक विशाल वटवृक्ष (वडाचे झाड) आहे. त्या झाडाला संपूर्ण सर्पाचा (भुजंगाचा) पहारा आहे. त्या झाडाच्या शिखरावर एक लोखंडी पिंजरा आहे त्यात एक कोंबडा आहे. तो कोंबडा मेला तर !! अलग भारती मरेल. जर तुला तुझे काकु काका, वडिल पाहिजे तर अगोदर तू या मोत्या कोंबड्याचा पिंजरा घेऊन ये ! मी त्याचा पिंजरा देऊन टाक तर अगोदर तुझी काकू ताब्यात घे नंतर तुझे वडील, काका यांना बोलावून घे. माझे काही ऐकायचे नाही व मोत्या कोंबड्याचा पिंजरा मागितला तर कोंबडा काढून पिंजरा त्याच्याकडे फेकून कोंबडा घेऊन आपल्या काकू, काका, वडिल सर्व घोडेस्वार आपल्या बावनगड नगरीचा रस्ता धरून सरळ निघून जावयाचे. तो मला बरोबर घेऊन आपल्या राजधानीत येईल मग संपूर्ण नगरीतील सर्व रहित दुनिया समोर त्या कोंबड्याचे पंख एक, एक तोडून फेकायचे नंतर पाय तोडायचे नंतर शेवटी डोकी मुंडके तोडून फेक म्हणजेच तो अलग मरेन. याप्रमाणे गंगाभारती पूर्वीच्या गुरू याने राजकुमार हरीसिंग याला निवेदन दिले.

संपूर्ण १२ गाडी जादूला तोच प्रतिकार जादू दिल्यावर मग सरळ घोड्यावर बसून सातसमुद्र पार करण्यास व तो मोत्या कोबंड्याचा पिंजरा घेण्यासाठी पाठविला. त्याच प्रमाणे राजकुमार हरीसिंग याने घोड्यावर बसून सात समुद्राचा रस्ता धरला व पहिल्या समुद्राजवळ जाऊन प्रतिकार जादूचा प्रयोग केल्याबरोबर समुद्रातील हिंस्त्र (मगर, मोठाले जलचर

प्राण्यांचे तोंड बांधले गेले व समुद्रात रस्ता तयार झाला याप्रमाणे त्याने सात समुद्र पार केले. मग पुढे घनदाट अरण्य लागले तेथे पण त्याने प्रतिकार जादुचा जप केला. तो अरण्यातील हिंस्त्र पशू पक्षी वाघ, सिंह, रिस,गिधाड हत्ती, वगैरे त्यांचे तोंड बांधले गेले. ते गाई, बकरीप्रमाणे गरीब झाले मग तो अरण्याचा रस्ता सुद्धा पार करून राजकुमार घोडेस्वार सरळ तो त्या भयंकर अरण्यातील वडाचे झाडाजवळ पोहचला व परत जादू मारली तो त्या झाडाच्या बुंध्यापासून थेट झाडाच्या शिखराजवळ पोहोचला. त्या मोठ्या कोंबड्याच्या पिंजऱ्याच्या संरक्षण करणाऱ्या भयंकर विषारी (सर्प) नाग, अजगरासारखे सर्प जादूने बांधले गेले व राजकुमार हरीसिंग याने घोड्यावरून ताडकन खाली उतरून त्याचा आधार घेऊन मोत्या कोंबड्याच्या पिंजऱ्याला हातात घेतले तोच इकडे काशीला अलग याला ताप चढला, तब्येत बिघडली त्याने सरळ घरी येऊन समाधी लावून पाहिले तर त्याचा मृत्यू जवळ येऊन ठेपला असे दिसले व तो सरळ पूर्वीच्या गुरू गंगाभारतीकडे आला व विनंतीपूर्वक पायावर डोके टेकीत म्हणाला हे माझ्या बापा मला वाचव कारण माझ्याकडून फारच मोठा गुन्हा झाला आहे तरी तू माफ कर बाबा. तेवढ्यात राजकुमार हरीसिंग हातात मोत्या कोंबड्याचा पिंजरा हातात घेऊन घोड्यावर बसून गंगाभारतीकडे विनंती करत होता तेव्हा त्या राजकुमाराला पाहिले व त्याने घोड्याजवळ जाऊन घोड्याच्या पुढच्या पायाजवळ पडला व विनंती पूर्व म्हणाला हे माझ्या बापा राजकुमारा मी तुझी काकु व तुझे वडील काका यांना तुझ्या स्वाधीन करून देतो पण माझा मोत्या कोंबडाचा पिंजरा मला देऊन टाक व त्याप्रमाणे त्याची काकू व ते सर्व काका वडील यानां १२ गाडी जादूने सजिव करून त्याच्यासमोर घोडेस्वार काकूसह हजर केले मग त्यांनी एकमेकास बोलून घोडे आपल्या राजनगरीच्या दिशेने वळविले व ते आपल्या राजधानी बावनगडला येऊन पोहचले. त्यांच्या मागोमाग दोघे साधू गंगाभारती व अलग भारती हे सुद्धा बावनगडला नगरीतील माणिक चौकात आले. तो मुलगा राजकुमार घोड्यावर बसून हातात मोत्या कोंबड्याचा पिंजरा घेऊन उभा होता त्याच ठिकाणी दोघे साधू आले व त्याला विनंतीपूर्वक बोलून तो आमचा पिंजरा देऊन टाक. त्यावर त्याने मोत्या कोंबडा काढून खाली पिंजरा त्या अलग भारती साधूच्या अंगावर फेकून दिला व कोंबडा हातात धरून तो त्या कोंबड्याला हाताने मारू लागला. त्याच्या मारण्याने इकडे अलग भारती चक्कर खाऊन गरगर गिरक्या मारू लागला व मला माफ कर माझा मोत्या कोबंडा परत दे असे वारंवार बोलू लागला. पण राजकुमार कोंबड्याचे एक एक अवयव तोडून फेकू लागला, पंख तोडले तेव्हा अलगचे हात तुटले, पाय तोडले तेव्हा अलगचे पाय तुटले, तो जमिनीवर गरगरा फिरून रडत विनंती करू लागला पण तेवढ्यात राजकुमाराने त्या कोंबड्याचे डोके तोडून जमिनीवर फेकले तेवढ्यात त्या अलगची शिर तुटून तो शेवटच्या श्वास सोडून यमलोकी गेला. सर्व नगरवासी आश्चर्य चकित होऊन हा चमत्कार पहात राहिले व त्या राजकुमाराची प्रशंसा करीत आनंदित झाले. मग त्याचे वडील, काका व आजोबा यांनी त्याची गावात मिरवणूक काढून राज अभिषेक करून त्या शूर व धाडसी, चाणक्य अशा राजकुमाराला राज्य पदावर आरूढ करून पूर्वीचा राजगुरू गंगाभारती याला परत राजदरबारात ठेवून घेतले व त्याचे राज्य सुखी समाधानी चालू राहिले.

• • •

# लेडीज होस्टल

*- भुजंग मेश्राम*

## १. अळ्या

ताटात अळ्या निंगाल्या, निंगू दे
बाय, डोस्क्यात पडू नगं देऊ तेवढे

किड्या मुंगीवानी घ्या पिढ्याची जीझानि
किडूक मिडूक बलुत्याची हमी
अंगावर गांडूळ वळवळतांना
तू नाय खाल्ल्या का शेवळ्या ?
मघाच्या नक्षत्रात
नाय करपल्या तरोटी भाकऱ्या ?
न वेचता धतुऱ्याच्या बिया
दळलं बोभाट जात्यावर दळण
लेंड्या पडल्या वरणात
खडे गेले जठरात
तरी जवळ फिरकलं नाय मरन्
नासुक अळीवानी हल्का जीवजंतू
पर तुहा जीव लाग्ला वळवळाया
मंजी, आजी मेली न् जलामला नातू !

लय जुन्या वकताला
पोटची पोरं घ्या लागाची देवऋषी आश्रमात
मंजी काळजावर धोंड्यावानी आपलाच हात
पोरी अक्षी ठिवाया आता बोर्डींग-साळेत
छडी-काडी, अळी-बिळी,
हे सर्वच असावे लागे ठाऊक

तवा रापलेलं कष्टाचं इद्यापीठ
बाटाच्या इंगळ्या अन् अन्नातल्या अळ्यां एक कशा ?
इंगळ्यांची भारी आगाग
अळी निरूपद्रवी
मंजी नजरेत सृष्टी हवी

आयुक्शाचं ताट ना वंशाची ओटी
भराया लागती जलाम
तवा बंडाची काय घाई ?
ताटात निंगाल्या निंगू दे
डोस्क्यात पडू नगं देऊ गडे

## २. चिंबोरी

वॉर्डनच्या मेस्टना आवडते चिंबोरीचे काल्वन
!
चिंबोरीला दातरी नांगी
नांगी जशी कर्वत कैची
चिंबोरी फकस्त धरू शकते बाई

गावकुसाबाहीर लेडीस होस्टेल
पाठी टेकडी, बाजूला ओहोळ
जो बारमाही पिंडेवानी झुळझुळ
शरीरधर्म पाळायला नाला मुका एकांत
नितळ धारेत, शांत डोहात पोरीचा शिनगार
त्यात श्रमदानाच्या अंगाने आलेलं

चिंबोऱ्या धरायचं आव्हान
कपारीत मोडतांना चिंबोऱ्या
छाटलं गेलंच चुकून अंगठा
तर समजायची गुरूदक्षणा
पर चिंबोरीऐवजी जर साप
तर बोंब : बिनकांती नागीण सुलक्षणा

चिंबोरीची कोरडी मोळी सोडली
वाटते त्यांची जावी नांगी
वेळेला पडल कामी
पर पाळीव बनलं का चिंबोरी ?

मला बी लय वाटते
चिंबोरीगत जपावी नांगी
ठेवावं सुरक्षित मनात.
अचानक वॉर्डन ओरडते-
पाहुण्यांना पसंत चिंबोरीपेक्षा नांगी !
- आता ग बाई ?

### ३. ऊवां

ऊवा म्हटल्या कि
आधी कुठल्या टंचायच्या
केसांतल्या कि कपड्यांतल्या ?
रक्तातल्या पांढऱ्या पेशींची काळीसावळी
वळ्क होताना ऊवांची जानपछान

लाजकाज
कुठंबी हात
काचकोरी खाज
खरडोची साथ

मंतानी
पोरींनी ठरवलं हरेक बेडपार्टनरने ठेवाचे
एकमेकांकडं पाय

दुसऱ्यां दिवशीच्या रात्री नवसाक्षर ऊवां
उघड्या पुस्तकांतल्याओळींवर
शिस्तित भटकतांना ...

### ४.

डोस्क्याला डोस्कं लागलं म्हंजी
इच्याराचा हुईलच प्रचार
याची काय गॅरंटी ?

टोकदार फणीनं विंचरलं डोकं
कि खवऱ्याची मळ अंगभर
तेल लावू लावू मेंगचटलेली वेणी
पाणि पोहू पोहू कोरडवाहू कातडी

आम्ही आडापाडातल्या कैऱ्या
मिळून साऱ्याजणी
स्त्रिसुलभ लपंडाव
सोशिकतेचा खेळ खेळू चला

पायाला पाय लागला कि सॉरी
हाताला हात लागला कि हॅलो
अंगाला अंग लागल की सगी
मनाला मन भिडलं कि चोरी
असं का ?

डोळ्याला निसर्ग कळला म्हंजी
सगळीच हमी.

● ● ●

# माळशेज

- भुजंग मेश्राम

माळशेज घाटावर बगळ्यांची पांढरीशुभ्रं फुलभाग फुलली
आवणी केली भातशेतांत खोडकिड्यांनी काढली खोडी
बेल्हे बाजाराचा दलाल रूमालाखाली हात लागला दाबाय
गुप्तवार्ता सांड उंडार हंबरला, 'भले भले साबाय ऽ साबाय ऽ'-

गावगढीची पांढरी चिकणमाती केस धुवाया उरली छाकटी
दळाया बसली सह्याद्रीवर बिननवऱ्याची नकटी
मोडं आलेलं कडधान्य शिंपलं वाऱ्यावर उडून गेलं भुर्रर्र
करकोच्या कलकलाटांवर फुंकतो गार्ड फुर्रर्र

भुकेला कोंडा निजेला धोंडा म्हणत प्यायलो आंबीलपेज
वेडावाकडा नाग घेऊन मांगगारूडी माळशेज
बाजाराचा वाढतांना भाव सह्याद्रीच्या तटबंदीच साकडं
प्राग - प्राचिन, प्राचीन-अर्वाचिन; इतिहास भुगोलाचं वाकडं

पाषाणात रूतलेल्या हाडरेषा म्युझीयम्समध्ये झाकल्यां
सह्याद्रीच्या पायवाटां बणज-गुराख्यांनीच राखल्या
भिमाशंकरचा पुसत पत्ता माळशेजेला गेली पारबता
घटावरून चमकला समुद्र पंचवटीकडे फिरली सिता

भंडारदऱ्याचा भंडारा घोटीचा बाजारहाट, नवां तसा जूना
वसईचं पान वेगुंर्ल्याची सुपारी पेठची कात पुण्याचा चुना
स्थलांतरीत पाखरांच्या जाण्यानंतर एकेक कोसळतात दरडी
भुमीगत अनुभूतीसाठी व्याकूळ, रस्त्यांची आपली मर्जी

• • •

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.


**पत्रव्यवहाराचा पत्ता :**


रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.


**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80.

# वर्गणीदारास महत्त्वाची सूचना




मनिऑर्डरच्या खालच्या बाजूस मजकूरासाठी असलेला भाग आम्हाला पोस्टाकडून पावती म्हणून मिळतो. बरेच वेळा या पावतीवर पाठविणाऱ्याचे नाव, पत्ता किंवा काहीही मजकूर नसतो. त्यामुळे वर्गणी कोणाची आली, कुठल्या वर्षाची, किती रुपये, पावती कोणाच्या नावाने करून कुठल्या पत्त्यावर पाठवायची हे समजत नाही. वर्गणीदारांची नंतर पावती, अंक न मिळाल्याची तक्रार येते. तरी गैरसोय टाळण्यासाठी वर्गणी पाठविताना मनिऑर्डर फॉर्मवर मजकूर लिहिण्यासाठी असलेल्या जागेत दोन्ही बाजूला आपले संपूर्ण नाव व पत्ता सुस्पष्ट अक्षरात अवश्य लिहावा.

PRINTED BY : ASSIGN SYSTEMS, PUNE 30.